




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १५३ * नांदेड * मंगळवार, दि. ९ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


### प. बंगालमध्ये महाराष्ट्राचा प्रयोग; ममता बॅनर्जींना हादऱ्याची मालिका सुरूच

# तब्बल ५८ आमदार फुटल्यानंतर आता २१ खासदार सुद्धा भाजपच्या गळाला?

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आमदारांच्या पाठोपाठ तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनीही ममता बॅनर्जी यांना सोडून दिले आहे. २८ पैकी २० लोकसभा खासदारांनी एनडीए सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. यावरून पश्चिम बंगालमध्ये महाराष्ट्रासारखा प्रयोग होत असल्याचे दिसून येत आहे.



खासदार आणि माजी टीएमसी नेत्या काकोली घोष दस्तीदार यांनी सोमवारी हाच दावा केला. त्यांनी सांगितले की, या २० खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांना एनडीएला पाठिंबा कळवला आहे. लवकरच अध्यक्षांना पत्र पाठवले जाईल. यापैकी ११ खासदारांनी सोमवारी दुपारी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे बंगाल प्रभारी भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानी बैठक घेतली. बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनीही त्यांची भेट घेतली.

या बैठकीला लोकसभा खासदार काकोली घोष, शताब्दी रॉय, अबू ताहेर, अरूप चक्रवर्ती, खलीलुर रहमान, शर्मिला सरकार, असित माल, कालीपदा सोरेन, जगदीश बसुनिया आणि प्रसून बॅनर्जी उपस्थित होते. सध्या टीएमसीचे लोकसभेत २८ आणि राज्यसभेत १३ खासदार आहेत. यापूर्वी, ३ जून रोजी बंगालच्या ८० आमदारांपैकी ५८ आमदारांनी एक वेगळा गट स्थापन केला होता. या गटाने ऋतब्रता यांना आपला नेता म्हणून नियुक्त केले. रात्री उशिरा टीएमसी खासदारांची एक बैठकही झाली, ज्यात फोटो काढण्यावरून वाद निर्माण झाला. रविवारी रात्री उशिरा दिल्लीत एका अज्ञात ठिकाणी २० टीएमसी खासदारांनी एक अनौपचारिक बैठक घेतली. खासदारांनी सध्याच्या नेतृत्व व्यवस्थेवर असमाधान व्यक्त केले.

या बैठकीचा एक फोटो सोशल मीडियावर समोर आला. त्यात अनेक टीएमसी खासदार एका टेबलाभोवती बसलेले दिसत आहेत. एका खासदाराने फोटो काढल्यावरून वाद निर्माण झाला. या फोटोमध्ये सुखेंदू शेखर राय हे देखील बसलेले दिसत आहेत.

## राज्यसभेसाठी राष्ट्रवादीच्या राजेंद्र जैन यांचा एकमेव अर्ज, बिनविरोध निवड निश्चित

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यसभेच्या एका जागेसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादीच्या राजेंद्र जैन यांची बिनविरोध निवड जवळपास निश्चित झाली आहे. महायुतीकडून राजेंद्र जैन यांचा एकमेव अर्ज दाखल करण्यात आला आहे. तर महाविकास आघाडीकडून एकही अर्ज दाखल झाला नाही. राज्यसभेसाठी एका अपक्षाचा अर्ज दाखल झाला असून तो अवैध ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळेच राजेंद्र जैन यांची निवड निश्चित मानली जात आहे.

अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीपर्यंत केवळ राजेंद्र जैन यांचाच मुख्य अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे जमा झाला आहे. त्यांच्याशिवाय एका अपक्ष उमेदवारानेही अर्ज दाखल केला आहे; मात्र मंगळवारी होणाऱ्या अर्ज छाननी प्रक्रियेत हा अपक्ष अर्ज तांत्रिक कारणांमुळे बाद होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. महाविकास आघाडीने या निवडणुकीतून पूर्णपणे माघार घेतल्याने आता ही निवडणूक केवळ औपचारिकता उरली आहे.

राजेंद्र जैन हे पूर्व विदर्भातील, विशेषतः भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील ज्येष्ठ आणि वजनदार राजकारणी म्हणून ओळखले जातात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विदर्भातील एक प्रमुख चेहरा म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल यांचे अत्यंत विश्वासू सहकारी आणि एकेकाळचे स्वीय सहाय्यक म्हणून त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली होती. प्रफुल्ल पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असताना त्यांचा पक्षात प्रभाव वाढत गेला. पक्षाने यापूर्वी त्यांना भंडारा-गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेवर पाठवले होते.

## भोकरमध्ये बोगस खत विक्रीचे मोठे रॅकेट उघड; गुन्हा दाखल

### तब्बल ७ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



**भोकर (प्रतिनिधी)–** भोकर तालुक्यात शेतकऱ्यांची फसवणूक करून बनावट पावत्यांच्या आधारे आणि ई-पॉस मशीनचा वापर न करता बेकायदेशीररित्या भेसळयुक्त खताची घरपोच विक्री करणाऱ्या एका रॅकेटचा भोकर पोलीस आणि कृषी विभागाने संयुक्त कारवाई करत पर्दाफाश केला आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी तब्बल ७ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून मुख्य आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ७ जून रोजी मौजे बल्लाळ तांडा ता. भोकर, जि. नांदेड येथे काही इसम ई-पॉस मशीनचा वापर न करता, शेतकऱ्यांना बनावट/भेसळयुक्त खताची विक्री करत असल्याची माहिती समोर आली. या माहितीच्या आधारे कृषी विभाग आणि पोलीस पथकाने रात्रीच्या वेळी बल्लाळ तांडा येथे धाड टाकली.

या कारवाईदरम्यान, एका अशोक लेलँड वाहनातून (क्रमांक एम.एच.२६ बी.ई.९४०७) संशयास्पद भेसळयुक्त खताची ६० पोती मिळून आली. या खताची किंमत १ लाख ८ हजार रुपये इतकी आहे. चौकशीदरम्यान, वाहनाचा चालक शीतलसिंग चव्हाण याने ही खते 'भाग्यलक्ष्मी ग्रो बायोटेक'चा मालक बालाजी माणिकराव करंडेकर याच्या सांगण्यावरून आणल्याची कबुली दिली.

आरोपी हे शेतकऱ्यांकडून 'फोन-पे' द्वारे आगाऊ रक्कम घ्यायचे आणि विना पावती खताची विक्री करत होते. अशा प्रकारे शासन आणि शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक केली जात होती.

या प्रकरणातील फिर्यादी प्रमोद माणिकराव कडेकर (वय ४९ वर्षे, नोकरी, ता. कृषी अधिकारी कार्यालय, भोकर) यांच्या तक्रारीवरून भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दगडू हाके यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. शैलेंद्र औटे, पो.उप.नि. दिलीप जाधव, पोहेकॉं विष्णू खिल्लारे, पोहेकॉ बालाजी लक्षटवार आणि पोकॉ खलील यांच्या पथकाने केली. सध्या या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिलीप जाधव करत आहेत.

जप्त करण्यात आलेल्या मालामध्ये ६० पोती भेसळयुक्त (एनपीके २०:२०:०:१३) खत (किंमत १, ८ हजार रुपये) आणि एक अशोक लेलँड वाहन (किंमत ६ लाख रुपये) असा एकूण ७ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे कृषी क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

## कॉकरोच जनता पार्टी दिल्लीनंतर पुण्यातही आंदोलन करणार

**पुणे (प्रतिनिधी)–** कॉकरोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी ११ जून रोजी पुण्यात आंदोलन होणार असल्याची घोषणा केली आहे.

दिल्लीतील जंतर मंतर येथील आंदोलनानंतर कॉकरोच जनता पक्षाचे हे दुसरे आंदोलन आहे. कॉकरोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके आणि पक्षाने या आंदोलनाची घोषणा केली. एका सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, महाराष्ट्राची शैक्षणिक राजधानी असलेल्या पुण्यात कॉकरोच पक्ष शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करेल. हे आंदोलन गुरुवारी (११ जून) दुपारी ४ वाजता पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठासमोर होणार असल्याचेही सांगण्यात आले.

कॉकरोच जनता पक्षाच्या स्थापनेपासून, पक्षाने शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी शनिवारी (६ जून) जंतर मंतरवर आपले पहिले आंदोलन केले. या आंदोलनात हजारो विद्यार्थी आणि नागरिक सहभागी झाले होते.

## मुल्लानपूर कसोटी तिसऱ्याच दिवशी निकाली

### टीम इंडियाचा आजवरचा सर्वात मोठा कसोटी विजय

**चंदीगड (प्रतिनिधी)–** मुल्लानपूर (न्यू चंदीगड) येथील महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर टीम इंडियाने दुबळ्या अफगाणिस्तानला अवघ्या तिसऱ्या दिवशी नमवत मोठा विजय मिळवला. भारतीय संघाने हा सामना एक डाव आणि ३०० धावांनी जिंकला. सामना तिसऱ्या दिवसाच्या तिसऱ्या सत्रात संपला. कसोटी क्रिकेटमधील भारताचा हा सर्वात मोठा डावाचा विजय होता. यापूर्वी, भारताने ऑक्टोबर २०१८ मध्ये राजकोट येथे वेस्ट इंडिजविरुद्ध एक डाव आणि २७२ धावांनी विजय मिळवला होता.



या सामन्यात, भारतीय संघाने आपला पहिला डाव ८ गडी बाद ५६४ धावांवर घोषित केला. त्यानंतर अफगाण संघ आपल्या पहिल्या डावात १५२ धावांवर सर्वबाद झाला आणि त्यांना फॉलो-ऑन देण्यास भाग पाडले गेले. आपल्या पहिल्या डावाच्या आधारावर भारताकडे ४१२ धावांची मोठी आघाडी होती. त्यानंतर अफगाणिस्तानचा दुसरा डाव ११२ धावांवर सर्वबाद झाला. भारतीय कर्णधार शुभमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.

फॉलो-ऑन खेळतानाही अफगाण संघाची सुरुवात खराब झाली. मोहम्मद सिराजने अब्दुल मलिकला अवघ्या ८ धावांवर बाद केले. त्यानंतर अफगाणिस्तानने नियमित अंतराने विकेट गमावल्या. सलामीवीर सेदिकुल्ला अटलने सर्वाधिक ४२ धावा केल्या. रहमानुल्ला गुरबाज (२४ धावा) आणि रहमत शाह (१३ धावा) यांनीही दुहेरी आकडा गाठला. फिरकी गोलंदाज वॉशिंग्टन सुंदरने चार आणि कुलदीप यादवने तीन बळी घेतले. दुखापतीमुळे शराफुद्दीन फलंदाजीला आला नाही.

## फिलीपिन्समध्ये ७.८ रिश्टर स्केलचा शक्तिशाली भूकंप; १५ जणांचा मृत्यू

**मनिला (वृत्तसंस्था)–** फिलीपिन्समध्ये सोमवारी ७.८ रिश्टर स्केल तीव्रतेचा अत्यंत शक्तिशाली भूकंप झाला असून, यामध्ये किमान १५ जणांचा मृत्यू झाला आहे, तर १२९ हून अधिक लोक जखमी झाले आहेत. फिलीपिन्सच्या नागरी संरक्षण कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

स्थानिक नागरी संरक्षण कार्यालयाचे संचालक रॉड्रिगो सोसमेना यांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ मृतांपैकी १२ जणांचा मृत्यू एकट्या 'सोक्ससारजेन' या चार प्रांत आणि एका शहराचा समावेश असलेल्या भागात झाला आहे. यामध्ये दक्षिण कोटाबाटो, सुलतान कुदरात, सारंगानी आणि जनरल सँटोस सिटी या भागांचा समावेश आहे.

## मेघराज राजे भोसलेंची अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळावर एकहाती सत्ता

**मुंबई (प्रतिनिधी)–** अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत माजी अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांच्या समर्थ पॅनलची सरशी झाली आहे. समर्थ पॅनलचे सर्व १४ ही उमेदवार विजयी झाले. बिनविरोध निवड झालेल्या तीनपैकी दोन जणांनी समर्थ पॅनेलला पाठिंबा दिला होता.

मेघराज राजे भोसलेंची अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळावर एकहाती सत्ता आली आहे. या निवडणुकीत अभिनेते विजय पाटकर विरुद्ध निर्माते मेघराज राजेभोसले यांच्या पॅनलमध्ये चुरस रंगली होती. १७ जागांपैकी तीन जागा बिनविरोध निवडून आल्या होत्या. १४ जागांसाठी ४५ उमेदवार रिंगणामध्ये होते.

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाची निवडणूक तब्बल नऊ वर्षांनी झाली. राज्यातील पाच ठिकाणी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीचे मतदान झाले. या निवडणुकीमध्ये केवळ ५० टक्के मतदान झाले होते. कोल्हापूर, पुणे, मुंबई, सोलापूर नाशिक या ठिकाणी मतदान पार पडले. या मतदानामध्ये मुंबईत सर्वात कमी प्रतिसाद मिळाला. राजकीय हस्तक्षेपाने ही निवडणूक प्रचंड चर्चेची बनली होती.

माजी अध्यक्ष मेघराज भोसले यांच्या नेतृत्वाखालील समर्थ पॅनल आणि अभिनेते आनंद काळे यांच्या चित्रकर्मी पॅनल यांच्यात थेट लढत झाली. अभिनेत्री विभागातून वर्षा उसगावकर यांची, गायक विभागातून ज्येष्ठ गायक आनंद शिंदे यांची तर संकलन विभागातून विजय खोचीकर यांची यापूर्वीच बिनविरोध निवड झाली आहे.

## डीआयजी उमाप यांच्या पथकाकडून आठवड्यात २,७०२ पानटपऱ्यांची झाडाझडती

### ४८ जणांवर ३० गुन्हे दाखल, ६७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** परिक्षेत्रात अवैध गुटखा साठा व विक्री करणाऱ्याविरुद्ध पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाने १ जून ते ३० जून दरम्यान विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेदरम्यान एक ते सात जून दरम्यान (पहिल्या आठवड्यात) २७०२ पानटपऱ्यांची झाडाझडती घेऊन ४८ जणांवर ३० गुन्हे दाखल केले. या कारवाईत ६७ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.


सदर मोहिमेदरम्यान संपलेल्या पहिल्या आठवड्यात, गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहिते अंतर्गत गुटखा विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध नांदेड जिल्ह्यात ५३० पान टपऱ्यांची तपासणी करून करून २५ लाख २१ हजार ७४१ रुपयांचा मुद्देमाल जप्त, परभणी जिल्ह्यात ८३९ पान टपऱ्यांची तपासणी करून एक लाख ६९ हजार ५३१, हिंगोली जिल्हयात ७२४ ठिकाणी तपासण्या करून बारा लाख ६४ हजार ४३, तर लातूर जिल्ह्यात ६०९ पान टपऱ्यांची तपासणी करून २७ लाख ४७ हजार ३५६ रुपयांचा असा एकूण ६७ लाख २ हजार ६७१ रुपये किंमतीचा गुटखा व अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे. ४८ आरोपी विरुद्ध ३० ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थाची पानटपऱ्यांवरून पान टपऱ्यांची व्यापक तपासणी मोहीम होणारी विक्री थांबविण्यासाठी पोलिसांनी पान टपऱ्यांची व्यापक तपासणी मोहीम हाती घेतली आहे. मागील आठवडयात नांदेड परिक्षेत्रात एकूण २,७०२ पान टपऱ्यांची तपासणी करण्यात आली असून, अंमली पदार्थाच्या साठवणुकीची संभाव्य ठिकाणे देखील तपासण्यात येत आहेत.



**'खबर' हेल्पलाइन ला वाढता प्रतिसादः** अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने ९१५०१ ००१०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिक अवैध व्यवसायांची अचूक माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहोचवत आहेत.

नागरिकांनी आपल्या भागातील गुटखा, अंमली पदार्थ व इतर अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेज द्वारे पाठवावी व आपल्या भागातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी आपला सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.




## विजेच्या कडकडाटासह झालेल्या पावसात वीज पडून चार म्हशींचा मृत्यू

**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट तालुक्यातील धानोरा, पिंपरी, भंडारवाडी परिसरात सोमवार, दि. ८ जून २०२६ रोजी सायंकाळच्या सुमारास झालेल्या जोरदार मुसळधार पावसासह सोसाट्याच्या वाऱ्यामध्ये वीज पडून चार जनावरांचा दुर्दैवी मृत्यू झाला.



मिळालेल्या माहितीनुसार, सायंकाळी सुमारे ४ वाजेच्या सुमारास परिसरात अचानक जोरदार पाऊस सुरू झाला. यावेळी विजांच्या कडकडाटासह वादळी वारे सुटले होते. दरम्यान, मोजे बेलोरी धानोरा येथील शेतकरी राजहंस देविदास फड यांच्या मालकीच्या दोन दुधाळ मोठ्या म्हशी आणि दोन वगारे (वय अंदाजे तीन वर्षे) यांच्यावर वीज कोसळली.

ही घटना सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास पिंपरी शिवारातील सूर्यकांत आत्माराम नागरगोजे यांच्या शेतात घडली. वीज पडल्याने चारही जनावरांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे शेतकरी राजहंस फड यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, पशुधनाची हानी झाल्याने कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# महिलांच्या बाबतीत वेगवान न्याय हवा?

भारतात महिलांच्या संरक्षणासाठी कायद्यांची कमतरता नाही. हुंडाबळी प्रतिबंधक कायदा, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, कार्यस्थळी लैंगिक छळविरोधी कायदे, पाठलाग, अत्याचार, मारहाण आणि लैंगिक गुन्ह्यांवरील कठोर तरतुदी, सर्व काही कागदावर प्रभावी दिसते. आपल्या देशाचे संविधान समानतेची, सन्मानाची आणि सुरक्षिततेची हमी देते. पण वास्तवात चित्र भयावह आहे. अनेकदा एखादी महिला जिवंत असताना मदतीसाठी न्यायालय, पोलीस ठाणे किंवा प्रशासनाचे दरवाजे ठोठावत राहते; मात्र तिच्या हाकेकडे दुर्लक्ष केले जाते आणि जेव्हा तिचा मृत्यू होतो, तेव्हा अचानक व्यवस्था जागी होते. भाषणे होतात, संताप व्यक्त होतो, चौकशांचे आदेश दिले जातात आणि सुधारण्याच्या घोषणा सुरू होतात. प्रश्न एवढाच आहे की, न्यायाला जाग येण्यासाठी एखाद्या महिलेचा मृत्यू होणे आवश्यक आहे का? आज भारतीय न्यायव्यवस्थेतील सर्वात मोठी समस्या म्हणजे विलंब. हा केवळ प्रशासकीय अकार्यक्षमतेचा प्रश्न नाही; हा संविधानिक अपयशाचा मुद्दा आहे. कारण महिलांविरुद्ध होणारे अत्याचार अचानक घडत नाहीत. घरगुती हिंसा, हुंड्यासाठी छळ, मानसिक दबाव, धमक्या आणि मारहाण हे सर्व टप्प्याटप्प्याने वाढत जातात. सुरुवातीच्या अवस्थेतच कायदा प्रभावीपणे हस्तक्षेप करू शकला, तर अनेक जीव वाचू शकतात. पण आपल्या व्यवस्थेत प्रक्रिया इतकी संथ आहे की, न्याय मिळेपर्यंत पीडित महिला अधिक असुरक्षित बनते. कायद्याने तातडीची मदत देण्याची तरतूद केली असली, तरी प्रत्यक्षात पहिली सुनावणी होण्यासाठी कित्येक महिने जातात. पुरावे गोळा करण्यातील विलंब, नोटिसा पोहोचण्यात होणारा उशीर, वारंवार तहकूब होणाऱ्या तारखा, पोलिसांचा निष्काळजीपणा आणि प्रशासनातील लालफीतशाही यामुळे महिलांच्या सुरक्षेचा हेतूच कमकुवत होतो. कायद्याचा उद्देश संरक्षण असतो; पण प्रक्रिया इतकी किचकट बनते की, तीच पीडितेसाठी शिक्षा ठरते. याहून गंभीर बाब म्हणजे कायद्याचा गैरवापर हा सतत पुढे केला जाणारा युक्तिवाद. कोणताही कायदा गैरवापरापासून पूर्णतः मुक्त नसतो, हे खरे आहे. खोट्या तक्रारी असू शकतात. पण भारतात महिलांच्या संरक्षणाच्या कायद्यांबाबत संशयाचे वातावरण इतके वाढवले गेले आहे की, अनेकदा पीडित महिलेच्या तक्रारीकडे सुरुवातीलाच अविश्वासाने पाहिले जाते. एखादी महिला मला वाचवा असे म्हणत असताना, तिच्या चारित्र्यावरच प्रश्नचिन्ह उभे केले जाते. परिणामी, आरोपीला वेळ मिळतो आणि पीडितेला असुरक्षिततेत जगावे लागते. या मानसिकतेचा सर्वात धोकादायक परिणाम म्हणजे महिलांमध्ये निर्माण होणारी भीती. जेव्हा समाजात वारंवार असे दिसते की, तक्रार करूनही न्याय मिळत नाही, उलट अपमान सहन करावा लागतो, तेव्हा अनेक महिला शेवटपर्यंत गप्प राहतात. परिस्थिती असह्य झाल्यावरच त्या पुढे येतात. पण तेव्हा अनेकदा खूप उशीर झालेला असतो. मग व्यवस्था केवळ मृत्यूची नोंद घेते; प्रतिबंध करण्याची संधी हरवलेली असते. अशोक खरात प्रकरणांमध्ये यापेक्षा वेगळे काय झाले आहे! संविधानाच्या दृष्टीने हा प्रश्न केवळ फौजदारी गुन्ह्यांचा नाही. हा समानतेचा प्रश्न आहे. कलम १४ सर्वांना कायद्यापुढे समानतेची हमी देते. पण जर महिलांना संरक्षणासाठी अधिक संघर्ष करावा लागत असेल, अधिक वेळ वाट पाहावी लागत असेल, तर ही समानता केवळ शब्दांपुरती उरते. कलम २१ जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याची हमी देते. मात्र एखाद्या महिलेचे जीवन उद्ध्वस्त झाल्यानंतरच न्यायप्रक्रिया सुरू होत असेल, तर त्या हमीचा अर्थ काय उरतो? न्याय मिळवण्याचा अधिकार हा स्वतःमध्ये मूलभूत अधिकार आहे. न्यायालयाचे दरवाजे खुले असणे पुरेसे नाही; न्याय प्रत्यक्षात, वेळेवर आणि प्रभावीपणे मिळाला पाहिजे. प्रक्रिया उपलब्ध असूनही ती व्यवहारात अप्राप्य असेल, तर तोही अन्यायच ठरतो. महिलांच्या प्रकरणांतील विलंब हा केवळ प्रलंबित खटल्यांचा प्रश्न नाही; तो लोकशाहीच्या नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह आहे. याबाबत सुधारणांची चर्चा अनेक वर्षांपासून सुरू आहे. पण प्रत्यक्ष बदलासाठी काही मूलभूत गोष्टी अनिवार्य आहेत. पोलिसांनी तक्रारींवर तातडीने कारवाई करणे, तपासावर कठोर देखरेख ठेवणे, आरोपपत्र वेळेत दाखल करणे, वारंवारच्या तहकूब संस्कृतीला आळा घालणे आणि विशेष न्यायालयांमध्ये खऱ्या अर्थाने प्रकरण व्यवस्थापन राबवणे आवश्यक आहे. फास्ट ट्रॅक न्यायालये फक्त नावापुरती न राहता त्यामागे प्रशासकीय शिस्त आणि जबाबदारी असली पाहिजे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, महिलांच्या तातडीच्या मदतीच्या मागणीला भावनिक प्रतिक्रिया म्हणून पाहण्याची वृत्ती बदलली पाहिजे. एखादी महिला संरक्षण मागते तेव्हा ती दया मागत नसते; ती आपला कायदेशीर हक्क मागत असते. त्या हक्काची खरी कसोटी केवळ टाळ्या घेणाऱ्या, पण निष्क्रिय अशा राजकीय नेत्यांच्या भाषणांमध्ये नाही, तर व्यवस्थेच्या वेगवान आणि गंभीर प्रतिसादात आहे. आज देशात सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे महिलांच्या मृत्यूनंतर व्यवस्था अत्यंत संवेदनशील बनते. मग शोकसभा होतात, निषेध मोर्चे निघतात, कठोर शिक्षेच्या घोषणा होतात. पण जिवंत असताना मदतीसाठी धावणाऱ्या महिलेकडे दुर्लक्ष केले जाते. जर न्यायव्यवस्थेला एखाद्या महिलेच्या मृत्यूनंतरच तातडीची जाणीव होत असेल, तर ती न्यायव्यवस्था प्रतिबंधक यंत्रणा नसून केवळ शोकनाट्य ठरते. आपल्या देशाला आता आणखी सहानुभूतीपूर्ण भाषणांची गरज नाही. गरज आहे ती अशा व्यवस्थेची जी महिलांचे ऐकेल, त्यांच्यावर विश्वास ठेवेल आणि त्यांना जिवंत असतानाच संरक्षण देईल. कारण एखाद्या महिलेची शोकवार्ता प्रसिद्ध होण्यापूर्वीच तिचे प्राण वाचवणे हीच खरी लोकशाही, हीच खरी न्यायव्यवस्था आणि हीच संविधानाची किमान अपेक्षा आहे.

# धरती आबा बिरसा मुंडांचा अमर वारसा



भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा विविध संघर्ष, त्याग, बलिदान आणि जनआंदोलनांनी समृद्ध झालेला इतिहास आहे. या इतिहासात अनेक महान नेत्यांनी आपल्या कार्याने आणि विचारांनी अमिट ठसा उमटविला आहे. तथापि, दीर्घकाळ भारतीय इतिहासलेखनाच्या मुख्य प्रवाहात काही अशा व्यक्तिमत्त्वांकडे तुलनेने कमी लक्ष दिले गेले, ज्यांनी आपल्या समाजासाठी आणि देशासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले. अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये बिरसा मुंडा यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी, स्वाभिमानासाठी आणि अस्तित्वासाठी संघर्ष करणारे बिरसा मुंडा हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे, सामाजिक परिवर्तनाचे आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे प्रतीक होते. आदिवासी समाज त्यांना प्रेमाने आणि आदराने धरती आबा म्हणजेच धरतीचे पिता म्हणून संबोधतो. ९ जून हा त्यांचा स्मृतिदिन असून हा दिवस केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा नसून आदिवासी समाजाच्या अस्मितेचा, संघर्षाचा आणि स्वाभिमानाचा गौरव करण्याचा दिवस आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारत ब्रिटिश सत्तेच्या जोखडाखाली होता. इंग्रजांनी आपल्या प्रशासनिक आणि आर्थिक धोरणांच्या माध्यमातून भारतीय समाजातील विविध घटकांवर प्रभाव टाकला. या धोरणांचा सर्वाधिक विपरीत परिणाम आदिवासी समाजावर झाला. जंगल, जमीन आणि जल यांवर आधारित जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाचे अस्तित्वच धोक्यात आले. ब्रिटिशांनी वनकायदे लागू करून जंगलांवरील आदिवासींचे पारंपरिक हक्क नाकारले. महसूल व्यवस्थेमुळे त्यांच्या जमिनींवर कर लादले गेले. सावकार, व्यापारी आणि जमीनदार यांच्या संगनमताने आदिवासींच्या जमिनी बळकावल्या जाऊ लागल्या. परिणामी हजारो आदिवासी कुटुंबे आपल्या पारंपरिक उपजीविकेपासून वंचित झाली. त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर गंभीर परिणाम झाला. अशा कठीण परिस्थितीत आदिवासी समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले.

१५ नोव्हेंबर १८७५ रोजी आजच्या झारखंड राज्यातील उलिहातू या गावात बिरसा मुंडा यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सुगना मुंडा आणि आई करमी हातू हे सामान्य आदिवासी कुटुंबातील कष्टकरी होते. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांच्या कुटुंबाला वारंवार स्थलांतर करावे लागत असे. अशा परिस्थितीत वाढलेल्या बिरसा यांना लहानपणापासूनच श्रम, संघर्ष आणि वास्तव जीवनाचा परिचय झाला. बालपणीच त्यांच्यामध्ये नेतृत्वाचे गुण आणि तीक्ष्ण निरीक्षणशक्ती दिसून येत होती. निसर्गाशी असलेले त्यांचे नाते अतिशय घट्ट होते. जंगल, डोंगर, नद्या आणि ग्रामीण जीवन यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल प्रभाव पडला.

बिरसा यांनी प्राथमिक शिक्षण स्थानिक शाळेत घेतले. पुढे त्यांना जर्मन मिशन शाळेत शिक्षण घेण्याची संधी मिळाली. शिक्षणामुळे त्यांच्या विचारविश्वाला नवी दिशा मिळाली. त्यांनी समाजातील विषमता, अन्याय आणि शोषण यांचे बारकाईने निरीक्षण केले. मिशनरी शिक्षणाच्या काळात त्यांना आधुनिक शिक्षणाचा परिचय झाला, परंतु त्याचवेळी त्यांनी आपल्या समाजाच्या सांस्कृतिक परंपरांचे महत्त्वही जाणले. शिक्षणामुळे त्यांच्यात चिकित्सक दृष्टिकोन विकसित झाला. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, अशिक्षण आणि व्यसनाधीनतेची कारणे समजून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच ब्रिटिश सत्तेच्या धोरणांमुळे आदिवासी समाजावर होणाऱ्या परिणामांचाही त्यांनी अभ्यास केला. त्या काळात आदिवासी समाज अनेक समस्यांनी ग्रस्त होता. आर्थिक शोषण, सामाजिक उपेक्षा, अशिक्षण आणि अंधश्रद्धा यांमुळे समाजाची प्रगती खुंटली होती. बिरसा यांनी ओळखले की समाजाच्या उन्नतीसाठी सर्वप्रथम सामाजिक जागृती आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी समाजसुधारणेचे कार्य हाती घेतले. त्यांनी लोकांना मद्यपान, जादूटोणा, अंधश्रद्धा आणि इतर सामाजिक कुरीतींपासून दूर राहण्याचे आवाहन केले. त्यांनी स्वच्छता, शिक्षण, शिस्त, नैतिकता आणि परिश्रम यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि प्रेरणादायी विचारांमुळे हजारो लोक त्यांच्या सभांमध्ये सहभागी होऊ लागले.

बिरसा मुंडा हे केवळ समाजसुधारक नव्हते, तर ते एक धार्मिक जागृतीचे प्रणेतेही होते. त्यांनी आदिवासी समाजाला त्यांच्या सांस्कृतिक आणि धार्मिक मुळांशी जोडण्याचा प्रयत्न केला. त्या काळात विविध धर्मप्रचारक संस्थांचा आदिवासी भागांमध्ये प्रभाव वाढत होता. अनेक आदिवासी आपली पारंपरिक ओळख गमावण्याच्या स्थितीत होते. बिरसा यांनी आदिवासी संस्कृती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचे संरक्षण करण्यासाठी चळवळ उभारली. त्यांनी एकेश्वरवादाचा संदेश दिला आणि नैतिक जीवन जगण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या अनुयायांमध्ये एक नवीन धार्मिक-सामाजिक चेतना निर्माण झाली. पुढे ही चळवळ बिरसाईत म्हणून प्रसिद्ध झाली.

१८९५ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे त्यांना अटक केली. त्यांना कारावासाची शिक्षा झाली. परंतु तुरुंगवासामुळे त्यांच्या लोकप्रियतेत घट झाली नाही. उलटपक्षी, त्यांचे विचार अधिक व्यापक प्रमाणात लोकांपर्यंत पोहोचले. तुरुंगातून सुटल्यानंतर त्यांनी नव्या जोमाने चळवळीला सुरुवात केली. त्यांनी आदिवासी समाजाला अधिक संघटित केले आणि ब्रिटिशांविरुद्ध संघर्षाची तयारी केली.

१८९९ आणि १९०० या काळात उलगुलान चळवळ आपल्या शिखरावर पोहोचली. हजारो आदिवासी बिरसा यांच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सत्तेविरुद्ध उभे राहिले. अनेक ठिकाणी सरकारी यंत्रणांविरुद्ध प्रतिकार करण्यात आला. शोषण करणाऱ्या जमीनदारांविरुद्ध संघर्ष उभारण्यात आला. या उठावामुळे ब्रिटिश प्रशासन हादरून गेले. आदिवासी समाजाची एकजूट आणि त्यांची संघर्षशक्ती पाहून ब्रिटिश सरकार चिंतेत पडले.

उलगुलान चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ राजकीय बंड नव्हती. ती सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक मुक्तीची चळवळ होती. आदिवासी समाजाला त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, त्यांची जमीन वाचविणे आणि त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देणे हे तिचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात या चळवळीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

बिरसा मुंडा यांचे जीवन हे प्रेरणेचा अखंड स्रोत आहे. त्यांनी अत्यंत कमी वयात आपल्या समाजाला नवी दिशा दिली. त्यांनी आदिवासी समाजात स्वाभिमानाची भावना जागवली. अन्यायाविरुद्ध लढण्याचे धैर्य दिले. त्यांनी दाखवून दिले की संघटित समाज कोणत्याही शोषणकारी व्यवस्थेला आव्हान देऊ शकतो. त्यांच्या नेतृत्वामुळे आदिवासी समाजाला स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव झाली. त्यांच्या संघर्षाचा परिणाम पुढील काळात विविध धोरणांमध्ये दिसून आला. ब्रिटिश सरकारला आदिवासी प्रश्नांकडे गांभीर्याने पाहावे लागले. छोटानागपूर टेनन्सी कायद्यासारख्या उपाययोजनांमुळे आदिवासी जमिनींच्या संरक्षणासाठी काही प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे बिरसा मुंडा यांचे योगदान केवळ एका आंदोलनापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा दीर्घकालीन प्रभाव पडला.


स्वातंत्र्यानंतर भारताने सामाजिक न्याय आणि समतेच्या दिशेने अनेक पावले उचलली. आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात आल्या. तरीही आज अनेक आदिवासी समुदाय दारिद्र्य, अशिक्षण, बेरोजगारी, आरोग्यविषयक समस्या आणि विस्थापन यांसारख्या आव्हानांना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत बिरसा मुंडा यांचे विचार आणि कार्य अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला आत्मसन्मान, संघटन आणि स्वावलंबनाचा संदेश आजही मार्गदर्शक आहे.

९ जून हा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की स्वातंत्र्य, समानता आणि न्याय यांसाठीचा संघर्ष कधीही व्यर्थ जात नाही. बिरसा मुंडा यांनी पेटवलेली स्वाभिमानाची ज्योत आजही लाखो लोकांच्या हृदयात तेवत आहे. त्यांनी दाखवून दिले की संघर्षातून परिवर्तन घडवून आणता येते आणि आत्मविश्वासाच्या बळावर कोणतीही गुलामी झुगारून देता येते. म्हणूनच ते केवळ इतिहासातील एक व्यक्ती नाहीत, तर एक विचार आहेत, एक प्रेरणा आहेत आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे शाश्वत प्रतीक आहेत.

धरती आबा बिरसा मुंडा यांचे जीवन भारतीय इतिहासातील तेजस्वी पर्व आहे. त्यांचा संघर्ष, त्याग, नेतृत्व आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश येणाऱ्या पिढ्यांना सतत प्रेरणा देत राहील. आदिवासी स्वाभिमानाचे हे महानायक, स्वातंत्र्याचे अमर सेनानी आणि सामाजिक न्यायाचे अखंड दीपस्तंभ म्हणून त्यांचे नाव भारतीय जनमानसात सदैव अजरामर राहील. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त या महान विभूतीस विनम्र अभिवादन करताना त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा आणि न्याय्य, समताधिष्ठित व मानवतावादी समाज घडविण्याचा संकल्प करूया. हाच त्यांना वाहिलेला खरा श्रद्धासुमनांचा हार ठरेल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो. ९८६०१०३५८२

# टीईटी परीक्षा; शिक्षक संभ्रमित?





सर्वोच्च न्यायालय. देशातील सबंध जनता ही एखाद्या वादाबाबत सर्वोच्च न्यायालयाकडे अगदी विश्वासानं पाहात असते. कारण त्यांची एक वेगळी गरीमा आहे व लोकांचा त्यावर विश्वास आहे. असे असताना सर्वोच्च न्यायालय जर एखाद्या प्रकरणात काहीबाही निर्णय देत असेल तर देशातील जनतेचा त्यांच्यावर विश्वासच उरत नाही. एक असंच प्रकरण. टीईटी परीक्षा प्रकरण. ज्यातून देशातील सर्वोच्च न्यायालयानं जे विधान केलं त्यातून बऱ्याच कार्यरत शिक्षकांचा सर्वोच्च न्यायालयावरील विश्वास उडत चाललेला आहे व ते सर्वोच्च न्यायालयालाही दोष देत आपल्या आंदोलनाची दिशा ठरवीत आहेत असे दिसते.

टीईटी परीक्षा. शिक्षक म्हणून कार्यरत राहण्यासाठी त्यांना योग्य ठरविणारी परीक्षा. जी टीईटी देऊन शिक्षक योग्य बनणार आहेत. तेही प्राथमिक शाळेतील शिक्षक. याचाच अर्थ असा की, बाकी शाळेतील शिक्षक हे शिक्षक म्हणून शाळेत शिकविण्यासाठी पात्र आहेत.

टीईटी परीक्षा. कोणाला द्यायची आहे टीईटी परीक्षा? त्या शिक्षकांना द्यायची आहे, जे शिक्षक प्राथमिक शाळेत शिकवतात. ज्या शिक्षकांना नोकरीतून निवृत्त होण्यासाठी पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी शिल्लक आहे. तसेच शिक्षक हे सध्याच्या काळात शाळेत शिकविण्यासाठी योग्य नाहीत. असं न्यायालयाचं म्हणणं. आता ते योग्य की अयोग्य, पात्र की अपात्र. हे तपासण्यासाठी त्यांच्याबाबतीत काही गोष्टी जाणून घेणे गरजेचे आहे.

शिक्षक...प्राथमिक शाळेतील शिक्षक बनण्यासाठी एक प्रक्रिया आहे. त्यात एक विद्यार्थी बारावी पास झाला की, त्याला शिक्षक बनण्यासाठी फॉम भरावा लागतो. ज्यातील शिक्षण तो विद्यार्थी दोन वर्षे शिकतो. ज्यात दोन परीक्षा असतात. त्या पास झाल्या की बस, तो मुलगा शिक्षक बनतो व शिक्षक म्हणून शिकविण्यासाठी पात्र ठरतो. त्यानंतर तो सदर शिक्षण पूर्ण करताच स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्न करतो. ज्यात तो जेव्हा एखाद्या शाळेत जातो. त्यावेळेस सन १९८१ च्या शाळा सेवा शर्ती पाहिल्या जातात. ही त्याची तिसरी परीक्षा असते. ज्यातून तो नियुक्त होतो त्यानंतर तो जेव्हा नोकरीला लागतो. तेव्हा वर्षभर त्याचे प्रशिक्षण फौंड असतात. ती प्रशिक्षणं असतात, शिक्षणात होत असलेल्या बदलांबाबत.

प्राथमिक शिक्षक म्हणून भर्ती करण्याची प्रक्रिया. ही प्रक्रिया करीत असताना तो शिक्षक प्रशिक्षित आहे का? हे पाहात असताना त्याचं प्रशिक्षण पाहिलं जातं. अर्थातच व्यावसायिक पात्रता परीक्षा पास आहे का? हे पाहिलं जातं. त्यानंतर पाहिलं जातं, तो सन १९८१ च्या शिक्षक बनण्याच्या पात्रतेच्या कसोटीत बसतो काय? त्यानंतर त्याची नियुक्ती झाल्यानंतर तोच शिक्षक वेळोवेळी दरवर्षी प्रशिक्षणं करीत असतो आणि सोबतच अशाच प्रशिक्षणानंतर बारा व चोवीस वर्ष झाले की प्रशिक्षण करतो. एवढंच नाही तर त्या प्रशिक्षणानंतर परीक्षाही देतो. त्यात पास होतो. तरीही आज न्यायालय म्हणतं की, शिक्षक हा पात्र नाही. त्यानं टीईटी परीक्षा द्यावी. तेही सुप्रीम कोर्ट. खरंच सर्वोच्च न्यायालयानं शिक्षकांच्या बाबतीत जे विधान केलं की ते योग्य नाहीत. जरी त्यांची सेवा सलग, बारा व चोवीस वर्षांची झाली तरी. याला आधार तरी आहे का पुरेसा? आधार असू शकतो का पुरेसा? खरंच सुप्रीम कोर्टाला शिक्षकांचं जीवन व जगणं तरी समजत असेल काय? त्यातच मुख्य प्रश्न म्हणजे सर्वोच्च न्यायालयाला प्राथमिक शिक्षकांचं जीवनात येणारी दरवर्षीची प्रशिक्षणं तरी माहीत असतील काय? अन् ते दर बारा वर्षाने देत असलेल्या परीक्षा? त्याही विचार करण्यालायक गोष्टी आहेत. या ठिकाणी जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे. उदाहरणार्थ मासोळी ही पाण्यातच राहते व एका मासोळीला पाण्यातील जीवन माहीत असतं. ती पाण्यात राहात असताना पाण्यामध्ये कोणती संकटं येतात. ते मासोळ्यांनाच माहीत. ते इतर पाण्याबाहेर राहणाऱ्या लोकांना माहीत नसतंच. हीच म्हण लागू होते शिक्षकांना. शिक्षकांचं जीवन आहे, अशाच मासोळीसारखंच. ते न्यायाधीश महोदयांना कसं माहीत असू शकतं? तरीही न्यायाधीश महोदयांनी उचलली जीभ लावली टाळूला. ही म्हण वापरली व सर्व नोकरीवर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना धारेवर धरलं आणि रस्त्यावर उतरविण्याचा संकल्प केला. ज्यातून शिक्षक, जे आज नोकरीवर आहेत. ते न्यायाधीश व न्यायपालिकेवर ताशेरे ओढत आहेत. पण जरा लपूनछपून. कारण त्यांना माहीत आहे की, जर आपण उघडउघड बोललो तर हा न्यायालयाचा अपमान होतो व न्यायालय केव्हाही आपल्यावर अवमान याचिका दाखल करू शकतं.

सर्वोच्च न्यायालय. देशातील नागरिकांवर जर अत्याचार होत असेल, तर त्या अत्याचारावर दिलासा देणारी व्यवस्था. त्या न्यायालयाला कोणत्याही गोष्टीवर कोणत्याही स्वरुपाचा निर्णय घेता येतो, देता येतो की जो हिताचा असतो. तसंच प्राथमिक शिक्षक ही अशी व्यवस्था की, ज्या व्यवस्थेच्या हातात देशाचं भविष्य असतं. देशाचं भवितव्यही असतं. ती व्यवस्था देशासाठी उत्तम नागरिक घडवत असते, अगदी तन, मन, धन वापरुन. त्यातच वाढ करुन ही व्यवस्था साम, दाम, दंड यासारख्याही पूर्वी गोष्टी वापरायचे आपल्या हातातील भविष्यांना अगदी सर्वगुणसंपन्न करीत असताना. आता शासनानं त्यांच्याकडून दंड आणि दाम काढून टाकले आहे, केवळ साम या पद्धतीचाच वापर करा. असा फतवा काढला आहे. तरीही शिक्षक नावाच्या व्यवस्थेची ओरड नाही आणि नव्हतीच. तरीही काही काही शाळेत शिक्षण दामाचा वापर करतातच. ज्यातून स्वतः शिक्षक गरीब विद्यार्थ्यांना गणवेश घेवून देतात. कोणी पुस्तके घेवून देतात. परंतु त्यांना सखोल ज्ञान देतातच. ज्यातून त्यांना हातातून घडणारं भविष्य. त्या भविष्यानं सोनं होतं. ज्यातून कोणी संशोधक, कोणी न्यायाधीश, कोणी राष्ट्रपती तर कोणी पंतप्रधान होतात. या सर्वांना घडविणारी व बनविणारी शिक्षक नावाची व्यवस्था, त्यांच्याकडे असलेली जबाबदारी अगदी इमानीइतबारे पार पाडते, त्यांच्याकडून एकही रुपया न घेता. देशाच्या भविष्याकडून पैसा शिक्षण शुल्क म्हणून तेच घेतात आणि घेत आहेत, जे शिक्षक नाही. असे असताना सध्या न्यायाधीश, अन् तेही सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश शिक्षकांना अपात्र आहेत असं संबोधून त्यांना पात्र ठरविण्यासाठी टीईटी द्यावी म्हणतात. ते योग्य नाही अन् त्याबद्दल उघडपण बोलणं हा न्यायीक अपमान जरी असला तरी प्राथमिक शिक्षक तशा प्रकारानुसार वक्तव्य करु लागले आहेत. ज्यातून खरंच न्यायालयाचा अवमान होतो आहे. आज फेसबुकवर, इन्ट्राग्राम व मीडियावर या स्वरुपाच्या कितीतरी कमेंट आहेत. ज्यातून सर्वोच्च न्यायालय बदनाम होत आहे.

सर्वोच्च न्यायालय. त्यांचं एक वेगळं असं महत्व आहे. तरीही शिक्षक बोलत आहे, सर्वोच्च न्यायालयाबद्दल काहीबाही. कारण जो गुन्हे करतो, त्याला गुन्हेगार समजलं जातं. तसाच गुन्हेगार हा अन्याय सहन करणाऱ्यांनाही समजलं जातं. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश महोदयांनी दि. २९ जुलैला दिलेल्या निर्णयानुसार खरंच शिक्षकांवर अन्याय झाला आहे. कारण त्याच निर्णयानुसार आज जे कार्यरत शिक्षक आहेत. ते पात्र जरी असले तरी त्यांना अपात्र ठरवले गेले आहे. हा निर्णय म्हणजे नोकरीवर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या अनुभवाची हत्याच आहे. शिवाय असा सर्वोच्च न्यायालयाकडून निर्णय येणे म्हणजे त्यांचे जे महत्व देशातील प्राथमिक शिक्षकांना आतापर्यंत वाटत होतं. ते पुढं वाटणार नाही. याबाबतीत शंका येते. कारण ही टीईटी परीक्षेची सक्ती म्हणजे आजच्या काळातील पात्र व अनुभवसंपन्न असलेल्या शिक्षकांना अपात्र ठरविणारी कृती आहे. असंच शिक्षकांचं म्हणणं आहे. यातून शिक्षकांच्या मनात सर्वोच्च नाही तर कोणत्याही न्यायालयाबाबत भीती निर्माण झालेली असून सांशकता व संभ्रमताही निर्माण झाली आहे. ही गोष्ट जणू देशातील लोकशाही संपत चालली की काय? असंच वाटणारी असून ज्यातून पुढील काळात सर्वोच्च न्यायालयावरही कोणी विश्वास ठेवू शकणार नाही. असंही या शिक्षकांना वाटते हे तेवढंच खरं.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# मान्सून आणि जलसंग्रह : पावसाच्या पाण्याचे महत्त्व


मान्सून येऊन दाखल झाला आहे! बंगळुरू आणि मुंबईसह अनेक शहरांमध्ये मान्सूनपूर्व पावसाची मोठी बरसात झाली आहे. यंदा मान्सून पाऊस १०६ टक्के बरसणार असल्याची बातमी सगळ्यांनाच आनंद देऊन गेली आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे, आणि कोणत्याही कृषिप्रधान देशासाठी मान्सूनच्या काळात होणारा पाऊस अत्यंत महत्त्वाचा असतो. आजही भारतीय शेतकऱ्यांचा मोठा वर्ग सिंचनासाठी पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. आज जेव्हा जगातील मोठ्या लोकसंख्येला स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा नियमित पुरवठा मिळत नाही, तेव्हा पावसाचे नक्कीच स्वागत केले पाहिजे. मान्सून आपल्याला पावसाच्या पाण्याचा साठा करण्याची संधी देतो, जेणेकरून भविष्यासाठी त्या मौल्यवान संपत्तीचा संग्रह करता येईल. याबद्दल रहीमने फार पूर्वीच म्हटले आहे, रहिमन पानी राखिये, बिन पानी सब सून।

मान्सूनचे स्वागत म्हणजे काय तर... आपण पावसाच्या पाण्याचा योग्य वापर आणि संरक्षण याबाबत जागरूक असावे आणि आवश्यक तयारी ठेवावी. खरं तर, देशातील प्रति व्यक्ती पाण्याच्या उपलब्धतेचे आकडे पाहिले, तर पावसाच्या पाण्याचे संरक्षण का गरजेचे आहे हे समजते. काही काळापूर्वी राज्यसभेत सांगितले गेले की, एका अभ्यासानुसार २०२१ मध्ये भारतात सरासरी प्रति व्यक्ती वार्षिक पाण्याची उपलब्धता १३८६ घनमीटर होती, तर २०३१ साठी ही उपलब्धता १३८७ घनमीटर राहण्याचा अंदाज आहे. ही परिस्थिती चिंताजनक आहे, कारण १७०० घनमीटरपेक्षा कमी वार्षिक प्रति व्यक्ती पाण्याची उपलब्धता ही जलसंकटाची स्थिती मानली जाते. त्यातच भारतात पाण्याचे वितरण असमान आहे. काही भागांमध्ये नेहमीच पाण्याची उपलब्धता असते, तर काही ठिकाणी, विशेषतः उन्हाळ्यात, गरजेच्या पाण्यासाठी हिंसक संघर्षाची वेळ येते. याचे कारण म्हणजे भारतातील जलस्रोतांची परिस्थिती एकसमान नाही.

जुन्या जलस्रोतांच्या मार्गात नवीन वस्त्या किंवा बांधकामे आल्याने एक तोटा असा झाला की, थोड्याशा पावसाने वस्त्यांमध्ये जलसाठ्याची परिस्थिती निर्माण होते. महानगरांमध्ये वाढत्या लोकसंख्येमुळे नवीन वस्त्यांचे बांधकाम ही शहरी व्यवस्थापनाची गरज मानली जाऊ शकते, पण देशातील छोट्या शहरांमध्येही किरकोळ पावसामुळे पूरस्थिती निर्माण होते. याचे एक मोठे कारण म्हणजे, शहरांच्या भौगोलिक परिस्थितीला अनुसरून पावसाच्या पाण्याचा प्रवाह साठवण्यासाठी जुन्या काळात बांधलेले जलस्रोत एकतर उपेक्षेमुळे नष्ट झाले किंवा अतिक्रमणाचे बळी ठरले. चंबळ नदीच्या किनारी वसलेल्या राजस्थानच्या कोटा शहरातील अनेक वस्त्यांमधील भूजल पातळी याच कारणाने वेगाने खालावली आहे. अस्सीच्या दशकाच्या शेवटी एका धोरणांतर्गत प्रत्येक वस्तीत पाणी पोहोचवण्याच्या हेतूने अनेक नलकूप खणले गेले. आपण जमिनीतील पाणी आपल्या सुखासाठी वापरण्याचे धोरण तर बनवले, पण भूजल पातळी राखण्यासाठी उपायांवर गांभीर्याने विचार केला नाही. परिणामी, भारतातील बहुतांश भागांत भूजल झपाट्याने कमी होत आहे. जेव्हा स्वच्छ पाण्याची उपलब्धता संपूर्ण मानवजातीसाठी मोठी आव्हान बनत आहे, तेव्हा आता गरज आहे की आपण पावसाच्या पाण्याच्या संग्रह आणि संरक्षणाबाबत जागरूक होऊ!

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# सुसंस्कृत आणि विकासाभिमुख नेतृत्व; बालाजीराव पाटील अंबुलगेकर



सकारात्मक दृष्टीकोनसमोर ठेवून आणि त्याला परिश्रमाची जोड व दिशा ठरवून जी माणसे पुढे जातात ती जीवनात यशस्वी होतात. मुखेड कृषी उत्पन्न बाजार समितीने सभापती बालाजीराव पाटील अंबुलगेकर हे असेच सकारात्मक दृष्टी, परिश्रम आणि योग्य दिशा ठरवून यशस्वी झालेले उद्योजक आणि राजकारणी आहेत.

बालाजीराव पाटील यांनीही आपल्यामध्ये काय आहे, आपण काय करु शकतो हे ओळखून मार्गक्रमण केले आणि ते उद्योग, राजकारण, समाजकारणत यशस्वी झाले. त्यांचा जन्म ९ जून १९७१ रोजी अंबुलगा गावात शेतकरी कुटुंबात झाला. शिकल्यानंतर नोकरी करण्यापेक्षा उद्योग व्यवसाय करावा असे ठरवून ते त्या मार्गाकडे वळले. त्याचबरोबर राजकारणाची आवड असल्याने अंबुलगा ग्रामपंचायतच्या राजकारणात भाग घेतला आणि त्यांना यशही आले. ग्रामपंचायतच्या माध्यमातून गावात अनेक विकास कामे केली. नोव्हेंबर २००० मध्ये पाणी आडवा पाणी जिरवा यासारख्या मोहिमेत सहभागी होऊन गावातील बंधारा अडवून पाणी रोखण्याच्या कामात स्वत: श्रमदान केले. अंबुलगा येथे दरवर्षी भरणाऱ्या खंडोबाच्या यात्रेमध्ये सहभागी होऊन तनमनधनाने सहकार्य करतात.

मुखेडचे आमदार तुषार राठोड यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी मुखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत भाग घेतला. या निवडणुकीत यश आल्यानंतर आमदार तुषार राठोड यांनी त्यांना सभापतीच्या खुर्चित बसविले. राजकारण आणि उद्योग क्षेत्रात बालाजीराव पाटील यांनी यश मिळवले असले तरी त्यांनी सामाजिक बांधिलकी आणि मैत्री जपली. आज त्यांचा वाढदिवस आहे. त्यांचे आयष्य निरोगी राहावे आणि राजकारण व उद्योग क्षेत्रात भरभराटी होवो हिच सदिच्छा.

**-प्रा. डॉ. शिवाजी कांबळे**
मुखेड, जि. नांदेड

# रोजगार व स्वयंरोजगार निर्मिती करणारे ईडीपी अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठात उपलब्ध

**नांदेड (प्रतिनिधी)** –बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये पारंपरिक शिक्षणाबरोबरच कौशल्याधारित, उद्योगाभिमुख आणि रोजगारक्षम शिक्षणाची आवश्यकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पदवी पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या शोधात वर्षानुवर्षे भटकंती करण्याऐवजी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असतानाच उद्योगक्षेत्राच्या गरजांशी सुसंगत कौशल्ये आत्मसात करावीत, या उद्देशाने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर आणि प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली Apprenticeship Embedded Degree Programme अंतर्गत अनेक अभिनव आणि रोजगाराभिमुख पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

या अभ्यासक्रमांची विशेषता म्हणजे विद्यार्थ्यांना वर्गातील शिक्षणाबरोबरच उद्योग, प्रयोगशाळा, बँका, संशोधन संस्था आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थी पदवीधर होताच रोजगारासाठी सक्षम बनतील तसेच अनेक क्षेत्रांत स्वयंरोजगाराच्या संधीही निर्माण करू शकतील.

आरोग्यसेवा क्षेत्रात प्रशिक्षित मेडिकल लॅबोरेटरी तज्ज्ञांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. ही गरज लक्षात घेऊन जैविकशास्त्र संकुलामार्फत बी.एससी. मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना सूक्ष्मजीवशास्त्र, रोगप्रतिकारशास्त्र, क्लिनिकल बायोकेमिस्ट्री, हिमॅटोलॉजी, पॅथॉलॉजी, आण्विक रोगनिदान, रक्तपेढी व्यवस्थापन आणि प्रयोगशाळा गुणवत्ता नियंत्रण यांचे सखोल ज्ञान दिले जाते.

विद्यार्थ्यांना अत्याधुनिक निदान उपकरणांवर प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. विविध नमुन्यांचे परीक्षण, रोगनिदानासाठी आवश्यक चाचण्या, अहवालांचे विश्लेषण आणि गुणवत्ता नियंत्रण प्रक्रियेचे प्रशिक्षण या अभ्यासक्रमाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सरकारी व खासगी रुग्णालये, निदान प्रयोगशाळा, संशोधन संस्था, रक्तपेढ्या, औषधनिर्मिती कंपन्या, सार्वजनिक आरोग्य संस्था तसेच आरोग्यविषयक संशोधन क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. स्वतः ची निदान प्रयोगशाळा सुरू करण्याची क्षमता देखील या अभ्यासक्रमातून विकसित होते.

आजच्या माहितीप्रधान युगात डेटा हे नवे इंधन मानले जाते. डेटा विश्लेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि निर्णय प्रक्रियेमध्ये डेटा सायन्सची भूमिका अत्यंत महत्त्वाची बनली

## बारावीनंतर करिअरची नवी दिशा




आहे. विद्यापीठाच्या स्कूल ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेसमार्फत सुरू करण्यात आलेला बी.एससी. डेटा सायन्स अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील आधुनिक ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करतो.

या अभ्यासक्रमात पायथन प्रोग्रामिंग, सांख्यिकी, मशीन लर्निंग, जनरेटिव्ह एआय, डीप लर्निंग, डेटा व्हिज्युअलायझेशन, एमएलऑप्स आणि क्लाउड कॉम्प्युटिंग यांसारख्या विषयांचा समावेश आहे. उद्योगतज्ज्ञांकडून प्रत्यक्ष मार्गदर्शन, अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळा आणि पगारी अप्रेंटिसशिप यामुळे विद्यार्थ्यांना वास्तव उद्योगविश्वाचा अनुभव मिळतो. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर डेटा ॲनालिस्ट, डेटा सायंटिस्ट, एआय इंजिनिअर, बिझनेस ॲनालिस्ट, मशीन लर्निंग तज्ज्ञ अशा अनेक क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

जगभरातील उद्योग, आरोग्यसेवा, कृषी, वाहतूक आणि स्मार्ट सिटी प्रकल्पांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (खेढ) या तंत्रज्ञानांचा वेगाने वापर वाढत आहे. बी.एससी. ख आणि खेढ अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये करिअर घडविण्याची संधी उपलब्ध करून देतो. अभ्यासक्रमामध्ये मशीन लर्निंग, डेटा ॲनालिटिक्स, स्मार्ट सेन्सर्स, क्लाउड नेटवर्किंग, एम्बेडेड सिस्टीम्स, सायबर सुरक्षा आणि ऑटोमेशन यांसारख्या विषयांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रकल्पांद्वारे अनुभव दिला जातो. स्मार्ट उपकरणे, रोबोटिक्स आणि स्वयंचलित प्रणाली विकसित करण्यासाठी आवश्यक कौशल्ये या अभ्यासक्रमातून विकसित होतात.

डिजिटल माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे दर्जेदार कंटेंट निर्मितीला मोठी मागणी निर्माण झाली आहे. बी.ए. डिजिटल कंटेंट अँड क्रिएटिव्ह रायटिंग हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला आधुनिक डिजिटल जगाशी जोडतो.

कथा, कविता, ब्लॉग लेखन, पटकथा, जाहिरात लेखन, पत्रकारिता, सोशल मीडिया कंटेंट, पॉडकास्ट स्क्रिप्टिंग, वेब कंटेंट निर्मिती आणि डिजिटल स्टोरीटेलिंग यांसारख्या विषयांचे प्रशिक्षण दिले जाते. या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी कंटेंट रायटर, कॉपीरायटर, डिजिटल मीडिया तज्ज्ञ, पत्रकार, सोशल मीडिया व्यवस्थापक किंवा स्वतंत्र लेखक म्हणून करिअर घडवू शकतात. भारतातील बँकिंग, वित्तीय सेवा आणि करप्रणाली क्षेत्रामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाची मागणी सातत्याने वाढत आहे. ही गरज लक्षात घेऊन बी.कॉम. बँकिंग अँड टॅक्सेशन हा अभ्यासक्रम विकसित करण्यात आला आहे.

# हदगावात दोन शेतकरी कुटुंबात रक्तरंजीत संघर्ष, २० गंभीर जखमी

**हदगाव (प्रतिनिधी)** –तालुक्यातील कोथळा गावात दोन शेतकरी कुटुंबांमध्ये जुन्या आणि किरकोळ वादावरून काठ्या आणि दगडांनी अत्यंत भीषण हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सोमवार, दि. ८ जून रोजी सकाळी झालेल्या या जीवघेण्या हल्ल्यामध्ये दोन्ही गटांतील एकूण २० जण गंभीर जखमी झाले असून, यामध्ये महिला आणि एका अल्पवयीन मुलाचाही समावेश आहे.

हाणामारी इतकी तीव्र होती की, काहींचे डोके फुटून, काहींच्या पायातून तर एका व्यक्तीच्या पोटातून गंभीर रक्तस्त्राव होत आहे. सर्व जखमींना तातडीने हदगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, तेथे वैद्यकीय पथकाची मोठी धावपळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार कोथळा गावात चव्हाण आणि वानखेडे या दोन शेतकरी कुटुंबांमध्ये ३ जून २०२६ रोजी एका किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्यावेळी गावकऱ्यांनी आणि काही नागरिकांनी मध्यस्थी करून हा वाद गावातच मिटविला होता. मात्र, दोन्ही बाजूंच्या मनात या वादाचा राग धुमसत होता. सोमवारी सकाळी दोन्ही कुटुंबातील लोक शेतातून व गोठ्यातून दूध काढून घरी परत येत असताना अचानक त्यांच्यात पुन्हा शाब्दिक चकमक उडाली. या वादाचे रूपांतर काही वेळातच अत्यंत हिंसक हाणामारीत झाले. दोन्ही बाजूच्या लोकांनी एकमेकांवर लाठ्या-काठ्या आणि मोठमोठ्या दगडांनी सपासप वार करण्यास सुरुवात केली.

गावकऱ्यांचा गेल्या शंभर वर्षांपासूनचा जुना रस्ता समोरच्या व्यक्तींनी बळजबरीने अडवला असून, आम्ही तिथे विचारणा केली असता ते आम्हालाच बेदम मारहाण करत जीवे मारण्याची धमकी देत आहेत, असे त्यांनी सांगितले. दुसरीकडे, चव्हाण कुटुंबाने आपल्या बाजूची हकीकत सांगताना म्हटले की, आम्ही आमच्या घरावरील पाण्याच्या टाकीमध्ये पाण्याची पातळी किती आहे हे पाहण्यासाठी बॅटरीचा उजेड केला होता. मात्र, त्यांनी 'आमच्या घरावर बॅटरी का मारतो?' अशी खोटी कुरापत काढून आम्हाला आणि आमच्या घरातील महिलांना लाठ्या-काठ्यांनी मारहाण केली.

या तुंबळ मारामारीत वानखेडे गटातील १६ ते ६० वयोगटातील १ अल्पवयीन मुलगा, ९ पुरुष आणि २ महिला अशा १२ जणांचा समावेश आहे, तर चव्हाण गटातील २५ ते ८० वयोगटातील ७ पुरुष आणि १ महिला अशा ८ व्यक्ती जखमी आहेत. घटनेची माहिती मिळताच हदगाव उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. रवी मोरे यांनी आपल्या वैद्यकीय पथकासह जखमींवर तातडीने उपचार सुरू केले आहेत. अनेक जखमींना अंतर्गत मुका मार लागला असून काहींची प्रकृती चिंताजनक आहे. हदगाव पोलीस ठाण्याचे पथक रुग्णालयात आणि घटनास्थळी पोहोचले असून दोन्ही बाजूंचे जबाब घेऊन परस्परांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# कुख्यात गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेच्या अटकेत

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डेंजरस ॲक्टिव्हिटीज (एमपीडीए) अर्थात झोपडपट्टी दादा व सतत कायदा व सुव्यवस्था बाधित करणारा मागील काही दिवसांपासून फरार असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे यांच्या पथकाने अटक केली. त्याला नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

वरिष्ठांच्या आदेशावरून पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी आपले सहकारी सहायक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे व त्यांच्या पथकाला पेट्रोलींग करण्याच्या सूचना दिल्या. त्यावरून हे पथक दि. ८ जून रोजी नांदेड शहरात गस्त घालत होते. महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ मधिल पाहिजे आरोपी बालाजी माधव कांबळे (वय ४० रा. गोविंदनगर, नांदेड) हा गोविंदनगर भागात आला आहे अशी गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून सापळा लावून पाहिजे व फरार आरोपी बालाजी कांबळे यास ताब्यात घेवून त्यास पुढील कार्यवाहीसाठी नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# अधिक मासानिमित्त राहेर येथे श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन

## मंदारबुवा रामदासी यांच्या रसाळ वाणीतून सात दिवसीय भागवत कथामृताचा लाभ

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** –अधिक मासाच्या पावन पर्वाचे औचित्य साधत राहेर येथील प्राचीन व पवित्र श्री नृसिंह मंदिर परिसरात श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिराचे विश्वस्त धनंजय महाराज यांनी दिली आहे.

हा आध्यात्मिक सोहळा दि. ८ जून २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत संपन्न होणार असून, भाविकांना सात दिवस भागवत कथामृताचा लाभ घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

या ज्ञानयज्ञात समर्थ भक्त मंदारबुवा रामदासी आपल्या ओजस्वी, रसाळ व भक्तिरसाने ओतप्रोत वाणीतून श्रीमद भागवत महापुराणाचे निरूपण करणार आहेत. त्यांच्या प्रभावी प्रवचनातून भागवत धर्म, भक्ती, ज्ञान, वैराग्य,



सदाचार तसेच मानवी जीवनातील आध्यात्मिक मूल्यांचे महत्त्व उलगडून सांगितले जाणार आहे.

दररोज दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत कथा होणार असून परिसरातील तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ज्ञानयज्ञाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

अधिक मास हा धार्मिकदृष्ट्या अत्यंत पुण्यप्रद मानला जातो. या काळात भागवत कथा श्रवण, नामस्मरण, सत्संग व धर्मकार्यांना विशेष महत्त्व असल्याने राहेर येथे आयोजित हा कथा महोत्सव भाविकांसाठी आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे.

आयोजकांकडून भाविकांना विशेष सूचना देण्यात आली असून, या कार्यक्रमासाठी कोणतीही व्यक्ती देणगी गोळा करण्यासाठी आपल्या घरी अथवा व्यवसायस्थळी येणार नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये व देणगीबाबत सतर्कता बाळगावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

श्री नृसिंह मंदिराच्या पावन सान्निध्यात होणाऱ्या या सात दिवसीय श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिराचे विश्वस्त धनंजय महाराज देशमुख व जोशी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्त्या वेळेत पूर्ण करण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्त्या वेळेवर होत नसल्याने सीएचबी प्राध्यापकांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. शासनाने निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार सदरील नियुक्ती प्रक्रिया राबवावी, अशी मागणी नेट-सेट-पीएच.डी.धारक संघर्ष समितीने केली आहे.

अनेक महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर उशिराने तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

प्राध्यापकांचे एक-दोन महिन्यांचे मानधनही मिळत नाही. आधीच कमी मानधन, त्यात परीक्षा व सुट्टीच्या कालावधीत मानधन मिळत नसल्याने तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो.

समितीने निदर्शनास आणून दिले की, महाराष्ट्र शासनाच्या दि. १७ ऑक्टोबर २०२२ व दि. २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयांमध्ये तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी निश्चित वेळापत्रक व कार्यपद्धती स्पष्ट करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी कार्यभार निश्चित करून १५ जूनपूर्वी नियुक्ती प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. तसेच तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचे मानधन नियमितपणे दरमहा अदा करण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

# शिवराज्याभिषेक दिनानिमित्त 'शिवचरित्र' पुस्तकाचे वाटप



**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त रविवारी सायंकाळी 'शिवचरित्र' या पुस्तकाचे विश्वासू प्रवासी संघटनेचे अध्यक्ष शंकरराव नांदेडकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले

या प्रसंगी प्रवासी संघटनेचे उपाध्यक्ष कृष्णा उमरीकर, कोषाध्यक्ष बालाजीराव पवार, सदस्य बालाजीराव ढगे, अधिकारी आकाश भिसे, तेलंग, एन. डी. पवार व मोठ्या प्रमाणात प्रवासी उपस्थित होते

# शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाच्या महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुखपदी अनिल पाटील धमने

**नांदेड (प्रतिनिधी)** –शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाच्या महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुखपदी अनिल पाटील धमने यांची निवड करण्यात आली आहे.



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार व शिवसेनेचे मुख्य सचिव संजय मोरे, खा. डॉ. श्रीकांत शिंदे, प्रशांत पालांडे यांच्या मार्गदर्शनाखाली ओबीसी नेते तथा शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे प्रदेश अध्यक्ष ॲड. डॉ.पी बी. कुंभार यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाच्या महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुखपदी अनिल पाटील धमने यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# ध्यान हा समृद्धीचा सर्वोच्च अनुभव –डॉ. अजय गव्हाणे

**नांदेड (प्रतिनिधी)**– एकविसाव्या शतकातील मानवास ध्यानाची नितांत आवश्यकता आहे. आज अनावश्यक व्यस्तता, महत्त्वाकांक्षा, न पूर्ण होणाऱ्या अपेक्षा, प्रतीक्षेचा आणि संयमाचा अभाव, दुर्लक्ष करण्यासारख्या क्षुल्लक बाबीला महत्त्व, क्रोध ही मानवाची सर्वसामान्य वैशिष्ट्ये झालेली आहे. अशा परिस्थितीत दररोज ध्यानधारणा करणे हा सर्व समस्यांवर उपाय आहे. ध्यान हा समृद्धीचा सर्वोच्च अनुभव असल्याचे प्रतिपादन यशवंत महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख व नियमित ध्यान साधक डॉ. अजय गव्हाणे यांनी केले.

भगवान रजनीश ब्लेसिंग मेडिटेशन कम्युन, निळा रोड, तुलसी पेंट्सच्या जवळ, नांदेड येथे दर रविवारी संपन्न होणाऱ्या सक्रिय ध्यान समारोपप्रसंगी ते बोलत होते.



याप्रसंगी प्रा. महेंद्र देशमुख, लक्ष्मीकांत वानखेडे, डॉ. रवींद्र देशमुख, राम गाडे पाटील, संजय बोबडे, शिवाजी देशमुख आदी साधकांची उपस्थिती होती. ओशो रजनीश यांनी आधुनिक मानवाच्या समस्येवरील उपाययोजना म्हणून सक्रिय ध्यानाची निर्मिती केली. दर रविवारी सकाळी सात वाजता सक्रिय ध्यान पद्धतीचा असंख्य साधक लाभ घेत आहेत आणि जीवनात परिवर्तन अनुभवत आहेत.

ओशो रजनीश यांच्या हस्ते पन्नास वर्षांपूर्वी संन्यासीत स्वामी गोपाल भारती, स्वामी प्रशांत, मा सुगंधा यांनी या ध्यान केंद्राची २०१५ मध्ये निर्मिती केली असून देश विदेशातील विविध शिबिर संचालकांनी साधकांना मार्गदर्शन केलेले आहे. एक दिवशीय, तीन दिवसीय अशा विविध ध्यान शिबिरांमुळे नांदेडमध्ये ध्यान साधकांना साधनेकरिता चांगले ध्यान केंद्र उपलब्ध आहे.

# विद्यार्थ्यांच्या आत्महत्येस जबाबदार धरुन दोषींविरुद्ध गुन्हे दाखल करा; बसपाची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– नीट परीक्षा पेपर फुटीमुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्त्या मोठ्या प्रमाणात होत आहेत. विद्यार्थ्यांच्या आत्महत्ये जबाबदार धरून नीटमाफिया शिवराज मोटेगावकर व अन्य दोषींविरुद्ध खुनाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी बहुजन समाज पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

बहुजन समाज पक्षाचे मराठवाडा झोन प्रभारी मनिष कावळे, राज्य कार्यकारिणी सदस्य इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर आणि जिल्हाध्यक्ष सुभाष भोकरे यांनी लातूर येथील नुकत्याच आत्महत्या केलेल्या नीटच्या विद्यार्थिनी कु. मैथिली सोनवणे तसेच गंगाखेड येथील प्रथमेश मोहन राठोड यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. बारावी विज्ञान शाखेत शिकणाऱ्या मैथिली या विद्यार्थिनीला फक्त ५१.५० टक्के गुण मिळाले होते पण तिचा पेपर चांगला गेला होता. पेपरफुटीमुळे ती भयभीत झाली होती. तसेच परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील गोदावरी तांडा येथील १८ वर्षीय प्रथमेशने नांदेड येथे नीट परीक्षा दिली होती, ती रद्द झाल्याने तो भयभीत झाला होता. या तणावात त्याने विष पिऊन आत्महत्या केली. नीट परीक्षेत मी आता पास होत नाही असे म्हणत त्याने विषारी द्रव्य प्राशन केल्याचे आपल्या आईला सांगितले.

राज्यात होत असलेल्या सर्व जिल्ह्यातील विद्यार्थी आत्महत्येस शिवराज मोटेगावकर आणि सर्व भ्रष्ट कोचिंग क्लासेस जबाबदार आहेत. तेव्हा प्रशासनाने गांभीर्याने घ्यावे, असे नुकत्याच पार पडलेल्या बैठकीत ठराव घेण्यात आला.

या बैठकीचे सूत्रसंचालन बसपाचे जिल्हा महासचिव सुधाकर सरोदे यांनी केले तर प्रास्ताविक नांदेड महानगराध्यक्ष अनिकेत आळंदीकर यांनी केले. बैठकीत सखाराम इंगोले, लोकेश कांबळे, सटवा सोनकांबळे, शंकरराव कापसे, विठ्ठल कोठेवाड, बालाजी पल्लेवाड यांनीही आपले विचार मांडले.

# ऑपरेशन यात्री सुरक्षा व ऑपरेशन अमानतअंतर्गत आरपीएफ नांदेडची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –रेल्वे प्रवाशांची सुरक्षा व त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी रेल्वे सुरक्षा बल, नांदेड विभाग विविध प्रवासी-केंद्रित उपक्रम प्रभावीपणे राबवत असून, त्या अंतर्गत नुकतीच दोन महत्त्वपूर्ण यशस्वी कारवाई करण्यात आली आहे.

शुक्रवार, दि. ५ जून रोजी नांदेडचे एसआयपीएफ/सीआयबी दिलीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल वावळे हे परभणी रेल्वेस्थानकावर प्रवाशांच्या मालमत्तेची चोरी करणाऱ्या संशयितांवर नजर ठेवून होते. त्यावेळी गाडी क्रमांक १७६२९ पुणे-हजूर साहिब नांदेड एक्सप्रेसच्या थांब्यादरम्यान प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर एका संशयित व्यक्तीस ताब्यात घेण्यात आले.

संतोष (वय २७ वर्षे), रा. परभणी अशी त्याची ओळख पटली. सदर व्यक्ती सामान्य डब्याजवळ प्रवाशांच्या चढ-उताराच्या गर्दीचा



फायदा घेऊन त्यांच्या मालमत्तेची चोरी करण्याच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या फिरत असल्याचे आढळून आले.

पुढील कायदेशीर कारवाईसाठी संबंधित व्यक्तीस जीआरपी परभणी यांच्या ताब्यात देण्यात आले. जीआरपी परभणी यांनी त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ११० व ११७ अन्वये गुन्हा क्रमांक ११७/२०२६ नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

याच दिवशी सीआयबी/नांदेड पथकाने ऑपरेशन अमानत अंतर्गत हरवलेला मोबाईल फोन शोधून त्याच्या मूळ मालकास परत करून प्रामाणिकपणा व तत्परतेचे उत्तम उदाहरण दिले.

दि. ५ जून रोजी दुपारी परभणी रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वरील कॅन्टीन परिसरात गुप्त पाहणी करत असताना अमोल वावळे, एएसआयपीएफ/सीआयबी/नांदेड व जीआरपी कर्मचारी यांना सुमारे २५ हजार किंमतीचा रिअलमी कंपनीचा बेवारस मोबाईल फोन आढळून आला.

तपास व पडताळणीनंतर मोबाईलच्या मूळ मालकाचा शोध घेण्यात आला. मालकीची खात्री करून संबंधित मोबाईल जीआरपी कार्यालय, परभणी येथे त्याच्या खऱ्या मालकाकडे सुपूर्द करण्यात आला. मोबाईल परत मिळाल्याने संबंधिताने आरपीएफ व जीआरपी कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# कै. मारोती बाचेवाड यांना शासकीय मदत देण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– लोहा तालुक्यातील निळा येथील रहिवासी कै. मारोती पुंडलीक बाचेवाड वय ४२ यांनी लोहा तहसील कार्यालयाच्या प्रांगणातील लिंबाच्या झाडाला गळफाश घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात परिवारास शासकीय मदत देण्याची मागणी कोळी समाजाच्यावतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन भारतीय जनता पक्षाचे सदस्य तथा मराठवाडा कोळी महासंघ अध्यक्ष शंकर मनाळकर, के. ना. जेठेवाड, आनंदा रेजितवाड, पुंडलिक बोडलवार, शिवाजीराव गलांडे, रमेश बोईनवाड यांनी राज्याचे मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या सह जिल्हाधिकारी नांदेड व तहसीलदार लोहा दिले आहे.

या निवेदनात कै. मारोती पुंडलीक बाचेवाड यांनी दि. १ जून रोजी पहाटे लोहा तहसील कार्यालयाच्या प्रांगणातील लिंबाचे झाडाला फाशी घेवून आत्महत्या केली. त्यांचे पश्चात एक मुलगी, एक मुलगा, पत्नी व वयोवृध्द सासू-सासरे आहेत, मारोती बाचेवाड यांच्या निधनानंतर त्यांचे कुटुंब उघड्यावर पडले आहे. सध्या कुटुंबाचा पालनपोषण करणारा अधार गेल्यामुळे त्यांची पत्नी श्रीमती सविता मारोती बाचेवाड यांना वर्ग चार पदावर नोकरीस घ्यावे अथवा शासकीय मदत देण्यात यावी, अशी मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती...

# शिवार

# उत्पादनवाढीसाठी सघन कापूस लागवड पद्धत

**कापूस पिकाच्या जागतिक उत्पादकता (७५० किलो) आणि राष्ट्रीय उत्पादकता (४३९ किलो रुई) पाहता महाराष्ट्राची उत्पादकता (३२९ किलो) फारच कमी आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे महाराष्ट्राच्या कापूस क्षेत्रापैकी मोठ्या प्रमाणात कोरडवाहू लागवड होते. कोरडवाहू शेतकऱ्यासाठी कापूस हे महत्त्वाचे नगदी पीक आहे. अशा स्थितीमध्ये या शेतकऱ्यांची उत्पादकता वाढविण्यासाठी अनुरूप लागवड पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.**




विदेशातील लागवड पद्धतींचा अभ्यास करून त्यांच्या प्रमाणेच भारतातही कमी अंतरावर लागवड करून हेक्टरी रोपांची संख्या वाढविल्यास उत्पादकता वाढविता येऊ शकते, यावर संशोधन सुरू झाले. मात्र भारतात प्रामुख्याने संकरित कापूस वाणांची लागवड होते. या बियाण्यांच्या किमती अधिक असल्याने उत्पादन खर्चात वाढ होते. सोबतच अधिक वाढ असणाऱ्या संकरित वाणांची लागवड कमी अंतरावर केल्यास झाडांमध्ये दाटी होऊन त्याचे दुष्परिणाम होण्याची भीती असते. यासाठी मागील दहा वर्षांत संशोधन होऊन कोरडवाहू भागातील शेतकऱ्यासाठी सघन कापूस लागवड पद्धत विकसित करण्यात आली आहे.

## सघन लागवड पद्धत म्हणजे काय?

कपाशीची लागवड कमी अंतरावर करून हेक्टरी / एकरी झाडांची संख्या म्हणजेच घनता वाढविणे, यालाच सघन लागवड पद्धत म्हटले जाते. सघन लागवड पद्धतीमध्ये योग्य लागवडीचे अंतर, त्यासाठी अनुरूप वाणांची निवड, पिकाची वाढ नियंत्रित ठेवण्यासाठी वाढ व्यवस्थापन आणि वाढविलेल्या झाडांच्या संख्येसाठी पुरेसा अन्नद्रव्यांचा पुरवठा या बाबींवर लक्ष केंद्रित करावे लागते.

## लागवडीचे अंतर

रोपांची संख्या वाढविण्यासाठी लागवडीचे अंतर कमी करायचे असते. त्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठामध्ये केलेल्या संशोधनानुसार बीटी कापूस वाणांच्या लागवडीसाठी ९० × ३० सेंमी (३ × १ फूट) अंतराची शिफारस केलेली आहे. म्हणजेच दोन ओळींतील अंतर ९० सेंमी (३ फूट) ठेऊन दोन झाडांतील अंतर ३० सेंमी (१ फूट) ठेवावे. या अंतरावर लागवड केल्यास एक एकर क्षेत्रामध्ये १४५२० रोपे बसतील. सर्वसाधारणपणे महाराष्ट्रात विभागनिहाय व माती प्रकारानुसार कपाशीची लागवड ३ × २ फूट, ४ × १.५ फूट, ३ × ३ फूट, ४ × ३ फूट, ५ × १ फूट, ६ × १ फूट अशा विविध अंतरावर करण्यात येते. म्हणजेच या विविध पारंपरिक अंतरावरील लागवडीमध्ये एकरी झाडांची संख्या ७२६०, ४८४०, ३६३०, ८७१२ अशी असते. पारंपरिक लागवड पद्धतीपेक्षा सघन लागवडीमध्ये एकरी झाडांची संख्या दुप्पट ते चारपट राहते. या सघन लागवडीमध्ये एका झाडाला सरासरी २० बोंडे / कैऱ्या लागतील, असे अपेक्षित आहे.

## वाणांची निवड

सामान्यतः बीटी कापूस लागवडीमध्ये दीर्घ कालावधीची, वाढ अधिक असणारे व खत आणि सिंचनास प्रतिसाद देणारे संकरित वाण मोठ्या प्रमाणात वापरले जातात. तथापि, सघन लागवड पद्धतीसाठी आटोपशीर ठेवण असणारे (कॉम्पॅक्ट) वाण निवडणे आवश्यक आहे. म्हणजेच असे वाण की ज्यांच्या फांद्यांची लांबी आणि झाडाची उंची कमी आहे. बाजारातील बहुतांश वाण या निकषांमध्ये बसत नाहीत. काही निवडक कंपन्यांचे विशिष्ट वाणच सघन लागवडीस उपयुक्त आहेत. त्यामुळे सघन लागवडीसाठी उंची आणि फांद्यांची लांबी कमी असणारेच वाण निवडावे.

## वाढरोधकाचा वापर

सघन लागवडीमध्ये झाडांची वाढ आटोक्यात (उंची तीन फुटांपर्यंत) ठेवण्यासाठी वाढरोधकांचा वापर करणे आवश्यक आहे. याकरिता मेपीक्वाट क्लोराइड या वाढरोधकाच्या १२ मिलि प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे दोन वेळा फवारण्या कराव्या लागतील. यापैकी पहिली फवारणी पिकास पाते लागण्याच्या काळात (सरासरी ४५ दिवस) व दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी म्हणजेच ६० दिवसांच्या (फुले लागण्याच्या) काळात करावी. फवारणी करताना जमिनीमध्ये ओल असणे आवश्यक आहे. जमिनीमध्ये ओल नसल्यास पाऊस होईपर्यंत ३-४ दिवस फवारणीसाठी थांबावे अथवा उपलब्धता आल्यास संरक्षित सिंचन देऊन फवारणी करावी. या वाढरोधकाच्या फवारणीमुळे कापूस पिकाच्या कांड्यांमधील अंतर कमी होते. म्हणजेच शाकीय वाढीसाठी वापरले जाणारे अन्नघटक फुले लागणे आणि बोंडाच्या वाढीकरिता वापरली जातात. म्हणजेच झाडाची उंची आणि फांद्यांची लांबी आटोक्यात राहते, पण फुले आणि बोंडांची वाढ होते. सघन लागवडीमध्ये पिकाची वाढ जास्त झाल्यास अपेक्षित उत्पादन मिळणार नाही, हे लक्षात ठेवा. (* लेबल क्लेम आणि अॅग्रेस्को शिफारस दोन्ही आहे.)

## खत व्यवस्थापन

आपण सघन लागवडीमध्ये झाडांची एकरी संख्या वाढविलेली असते. त्यांची वाढ आटोक्यात ठेवूनही या वाढलेल्या झाडांपासून अपेक्षित वाढीव उत्पादन यांचे एकत्रित एकरी जैविक वजन (शाकीय वाढ + कपाशीचे वजन) अधिक होणार आहे. या कापसाच्या वाढलेल्या जैविक उत्पादनासाठी आवश्यक अन्नपुरवठा करण्यासाठी आपल्या विभागात पारंपरिक पद्धतीने बीटी कापूस पिकासाठी असलेल्या शिफारशीपेक्षा (पारंपरिक शिफारस १२० N : ६० P : ६० K) यापेक्षा स्फुरद आणि पालाशची मात्रा २५ टक्के अधिक द्यावी. मात्र नत्राची एक व दोन महिन्यांनी द्यावयाची मात्रा देण्यापूर्वी पिकाची वाढ पाहूनच निर्णय घ्यावा. वाढ समाधानकारक असल्यास नत्राची मात्रा वाढवू नये. अन्यथा, नत्राची मात्रा जास्त होऊन शाकीय वाढ जास्त होईल आणि पाते-फुले यांची संख्या कमी होईल. म्हणून नत्रयुक्त खतांचा वापर कमी करावा.

# ऊस पुर्न :रोप लागण पद्धत अन् व्यवस्थापन

**राज्यात लागण हंगामाप्रमाणे जून ते मार्च या कालावधीत मोठ्या प्रमाणावर ऊस लागवड होत असते. शेतकरी हंगाम निहाय विविध प्रसारित व पूर्व प्रसारित जातींचा वापर करून बेण्याद्वारे किंवा एक डोळा रोपाद्वारे लागण करतात. शेतकरी बेण्याऐवजी एक डोळा रोप लागणीस प्राधान्य देत आहेत. कारण रोपाद्वारे लागण केल्यास बेणे,लागण खर्चात बचत होते. तसेच एक महिना वेळेमध्ये बचत होते. एक डोळा रोप निर्मितीच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये सुपर केन नर्सरी, गादी वाफा पध्दत आणि ४२, ६० व ७० कप प्रो ट्रे तसेच एक डोळा पद्धतीचा वापरकरून रोप निर्मिती केली जाते.**



## गादी वाफा पध्दत

१ मीटर रुंद आणि १० मीटर लांबीचे वाफे तयार करावेत. गादी वाफे तयार करताना तळाशी प्लॅस्टिक पेपर किंवा खतांच्या रिकाम्या पिशव्या अंथरून त्यावर चांगले कुजलेले शेणखत व मातीचा मिश्रणाचा सहा इंच जाडीचा थर द्यावा. त्यावर बुरशीनाशक, कीटकनाशकाची बेणे प्रक्रिया केलेल्या दोन इंचाच्या एक डोळा कांड्या लावाव्यात. यासाठी कांडीतील अंतर एक ते दोन इंच आणि दोन ओळीतील अंतर एक इंच याप्रमाणे मांडणी करावी. त्यावर दोन ते अडीच सेंमी मातीचा थर दिल्यास अर्ध्या गुंठा क्षेत्रात (५० चौमी) एक हेक्टर क्षेत्राला पुरतील एवढी रोपे तयार होतात. रोपे काढताना गादी वाफ्यास पाणी देवून रोपे काढल्यास मुळ्या तुटत नाहीत आणि सुकत नाहीत. काढलेल्या रोपांची लागवड लवकर केल्यास रोपे मरीचे प्रमाण कमी होते. यासाठी खर्च सुध्दा कमी येऊन बेणे वाहतुकीचा खर्च कमी होतो.

## प्लॅस्टिक प्रो-ट्रे पध्दत

प्लॅस्टिक प्रो ट्रे ४२ आणि ६० कप, ५६० मि.मी. ३६० मि.मी. ७० मि.मी. आकार, ७५० मायक्रॉन जाडीचे वापरावेत. कोकोपीट हे चांगले निर्जंतुक केलेले असावे. त्याचा सामू ६.५ ते ७.५ असावा. नत्रः कर्बाचे प्रमाण २०:१, ईसी. ०.६ ते १०७ डेसिसायमन प्रति मिटरपर्यंत असावा, धाग्यांचे प्रमाण १० ते १५ टक्के व ओलावा २० टक्के पर्यंत असावा. एका ट्रेचे मिश्रण तयार करण्यासाठी कोकोपीट १ ते १.५ किलो, तांबडी माती ०.२५ किलो आणि रेती ०.२५ किलो या प्रमाणात घेऊन मिश्रणास बुरशीनाशक व सूत्रकृमी नियंत्रणासाठी प्रक्रिया करावी. प्रक्रिया युक्त मिश्रण ट्रेमध्ये भरून बेणे प्रक्रिया केलेली एक डोळा टिपरी वापरून ट्रे पूर्णपणे भरावा. हलके पाणी देऊन २०० किंवा ५०० मायक्रॉन प्लॅस्टिक पेपरने हवामानानुसार ७ ते ९ दिवसापर्यंत झाकून ठेवावा. त्यामुळे रोपे लवकर तयार होण्यास मदत होते. ३० ते ३५ दिवसाची रोपे लागणीस योग्य असतात. ही रोपे सुध्दा जोमाने वाढतात. फुटव्यांची संख्या जास्त मिळते. त्यामुळे बेणे उसाची संख्या आणि कांड्यांची संख्या जास्त मिळते. ४२ कप प्लॅस्टिक ट्रे मधील रोपांचे मरीचे प्रमाण कमी आहे. ६० ते ७० कपाच्या ट्रेमधील रोपांची विशेष काळजी घेतल्यास मर कमी होते.

## एक डोळा चकती पध्दत

प्रो-ट्रे मध्ये एक डोळा चकतीचा वापर केल्यास साधारणपणे २५ ते ३० किलो वजनाच्या चकतीमध्ये एका एकरासाठी लागणारी रोपे तयार होतात. चकती काढून राहिलेल्या उसाचा चाऱ्यासाठी किंवा गाळपासाठी वापर होतो. उसापासून डोळ्याची चकती काढण्यासाठी कुशल व अनुभवी मनुष्यबळ लागते. डोळे उगवणीचे प्रमाण ८० ते ८५ टक्के असते. रोपे मरण्याचे प्रमाण १० ते १५ टक्के असते. या पद्धतीत सुध्दा उसाची वाढ जोमाने होऊन बेणे संख्या जास्त मिळते.

## रोप लागवडीनंतरचे व्यवस्थापन

लागणीनंतर रोपास जोम धरण्यास १५ ते २० दिवसांचा कालावधी लागतो. लागणीपासून ७५ दिवसांपर्यंत हलके व वरचेवर पाणी द्यावे. जास्त पाणी दिल्यास रोप नीट वाढत नाही. मुळ्या खोलवर जात नाहीत, ऊस मोठा झाल्यावर लोळण्याची शक्यता असते. लागवडीनंतर ८ ते १० दिवसांनी वापसा असताना शिफारस केलेल्या निवडक तणनाशकाची फवारणी करावी. लागणीनंतर ३५ ते ४० दिवसांनी फुटवे फुटण्यास सुरवात होते, अशा अवस्थेत शेत तणविरहित असावे. पिकाची ५० ते ५५ दिवसांनी पाहणी करून जेठा कोंबाची वाढ व फुटव्यांची वाढ एक समान असल्यास जेठा कोंब काढू नये. त्यानंतर सूक्ष्म अन्नद्रव्यांची आठ दिवसांनी पहिली फवारणी करावी. रोप लावल्यानंतर जमीन वापशावर असताना जिवाणू खत २.५ लिटर प्रति हेक्टर या प्रमाणात पहिली आळवणी आणि पुढील प्रत्येक महिन्यात २.५ लिटर प्रति हेक्टर या प्रमाणे तीन वेळेस आळवणी करावी. लागणीच्या वेळी रोपाचे वय ४५ दिवसांपेक्षा जास्त असल्यास लागणीनंतर फुटवे येण्यास सुरुवात होते. जेठा कोंब आणि बुडातून येणारे फुटवे यांची वाढ एक समान नसेल तर जेठा कोंब हलका हिसका देऊन काढावा, म्हणजे येणाऱ्या सर्व फुटव्यांची वाढ एक समान होईल. ऊस कांडीवर येण्यापूर्वी सूक्ष्म अन्नद्रव्याची दुसरी फवारणी केल्यास वाढ जोमाने व एक समान होते. मोठ्या बांधणीच्या वेळी एका बेटास सरासरी १२ ते १८ फुटवे सरीच्यावर आल्यानंतर शिफारशीत खत मात्रा देवून मोठी बांधणी करावी. म्हणजे मरणाऱ्या फुटव्यांची संख्या कमी होते. खोडकीड, कांडी कीड व शेंडे किडीचे एकात्मिक पद्धतीने नियंत्रण करावे. ठिबक सिंचन असल्यास पाण्यात विरघळणाऱ्या रासायनिक खतांचा (उदा. युरिया, पांढरे पोटॅश) वापर केल्यास कमी खर्चात खत सिंचन करता येते. या करिता शिफारशीत खत मात्रांचा अवलंब करावा. पूर्वहंगामीसाठी ३४० किलो नत्र आणि सुरू हंगामासाठी २५० किलो नत्र प्रति हेक्टरी चार हप्त्यात द्यावे. स्फुरद १७० किलो प्रति हेक्टर आणि पालाश ११५ किलो प्रति हेक्टरी प्रत्येकी ५० टक्के लागणीच्यावेळी आणि ५० टक्के हप्ता मोठ्या बांधणीच्या वेळी विभागून द्यावा. लागणीच्यावेळी सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास प्रती हेक्टरी २५ किलो फेरस सल्फेट, २० किलो झिंक सल्फेट आणि १० किलो मॅंगेनीज सल्फेट आणि ५ किलो बोरॉन सेंद्रिय खतामध्ये मिसळून द्यावे.

## रोप लागणीचे फायदे

- बेणे बचत होते. नवीन प्रसारित जात कमी कालावधीत जास्त शेतकऱ्यापर्यंत पोहोचते.
- सर्व फुटव्यांची वाढ एकसमान झाल्याने प्रति एकरी ऊस संख्या जास्त मिळाल्याने उत्पादनात वाढ.
- खोडवा पीक चांगले येऊन उत्पादनात वाढ.
- ऊस लोळणे, पडण्याचे प्रमाण कमी होऊन रोग व किडींचा उपद्रव कमी होतो.
- मोठ्या बांधणीपर्यंत प्रत्येक रोपांची देखभाल करता येते, त्यामुळे नांग्या पडण्याचे प्रमाण कमी होते.
- फुटव्यांची संख्या, जास्त होऊन मोठ्या बांधणीपर्यंत अपेक्षीत पक्व ऊस संख्या ठेवण्यास मदत होते.




## रोप पुर्न :लागण करताना घ्यावयाची काळजी

- रोप ३० ते ३५ दिवसांचे असताना लागण करावी.
- लागणी अगोदर रोपाची पाने शेंड्याकडून १ ते १.५ इंचापर्यंत कापावीत.
- जास्त वयाच्या रोपांचा वापर केल्यास फुटव्यांवर परिणाम होतो.
- लागणी अगोदर रोपांना पाणी द्यावे. लागण करताना ट्रे मधील मिश्रणाचा गोळा फुटणारा नाही याची दक्षता घ्यावी.
- लागणी अगोदर सरीस पाणी घ्यावे. पावसाळ्यात पाणी साठत असल्यास वापसा झाल्यानंतर सरीच्या बगलेत रोपांची लागण करावी.
- शिफारशीत रासायनिक खत मात्रेपैकी ५० टक्के मात्रा खड्ड्यात मातीत मिसळून आणि त्याबरोबरच दाणेदार कीटकनाशकाचा वापर रोप लागणीच्या वेळी करावा.
- रोपांची लागण सरीत जास्त खोलवर करू नये, कारण यामुळे फूट कमी होते.
- लागणीनंतर पाण्याचा प्रवाह कमी ठेऊन हलके पाणी द्यावे.
- दोन रोपातील अंतरावर रोपांची संख्या निश्चित करावी.
- रोपांना मर आल्यास वापसा असताना कार्बेन्डाझिमची (२ टक्के) आळवणी करावी.
- नांग्या भरण्यासाठी ५ ते १० टक्के जादा रोपे राखून ठेवावीत.

# सोयाबीन लागवड तंत्रज्ञान!

**जास्तीत जास्त उत्पादन देणारे नगदी पीक म्हणून अनेक शेतकरी सोयाबीन पिकाची निवड करतात. सलाम किसान समूहाकडून शेतकऱ्यांसाठी हरभरा लागवड तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे.**



- जमिनीची मशागत : जमीन चांगली नांगरून जमिनीची २ ते ३ वेळा वखरणी करावी. म्हणजे जमीन भुसभुशीत होईल. सिंगल सुपर फॉस्फेट - १ बॅग (५० किलो) जय संजीवनी – ५ किलोवरील घटकांची फवारणी करून पुन्हा एकदा नांगरणी करावी. (घटकांचे प्रमाण प्रति एकरसाठी दिलेले आहे.)
- वाण निवड : केडीएस ३४४, पीके ४७२, टीएएमएस ३८, एमएसीएस ११८८, फुले कल्याणी, जेएस ९३०५, केएस १०३, डीएस २२५ किंवा बाजारात उपलब्ध असलेले कोणतेही बियाणे तुम्ही निवडू शकता. बियाण्याचे प्रमाण भारी जमिनीसाठी एकरी २२ ते २५ किलो तर हलक्या जमिनीसाठी २५ ते ३० किलो बियाणे लागते.
- बियाणे प्रक्रिया : पेरणीपूर्वी पुढील घटक १ लिटर पाण्यात मिसळून या मिश्रणात हे बियाणे भिजवून रात्रभर सावलीत वाळवावे. त्यानंतरच पेरणी करावी. ह्युमिक जेल - १०० ग्रॅम, मठ्ठा- कार्ब ५० - १०० ग्रॅम.
- खत व्यवस्थापन : सोयाबीनची लागवड जून व जुलै महिन्यात केली जाते. भारी व काळी माती असल्यास २ ओळींमधील अंतर २ फूट ठेवावे व मध्यम व हलक्या जमिनीत २ ओळींतील अंतर १.५ फूट ठेवावे. तूर हे आंतरपीक म्हणून घ्यायचे असल्यास ६:१ किंवा ८:१ या प्रमाणात लागवड करावी. खताची पहिली मात्रा पेरणीसोबत द्यावी. २०:२०:००:१३ - १ पिशवी (५० किलो) हाय पॉवर - १० किलोशक्ती सोने - १० किलो (घटकांचे प्रमाण हे प्रति एकरसाठी दिले आहे.)
- पहिली फवारणी : पहिली फवारणी पेरणीनंतर १८ ते २२ दिवसांनी करावी. खाली दिलेल्या घटकांचे प्रमाण प्रति १५ लिटर पंपासाठी आहे. ह्युमिक जेल - २५ ग्रॅम, चॅलेंजर - ५ मिली, व्हे-ठोक - २० ग्रॅम, पॉवर सेव्हर (स्टिकर) मिसळणे - प्रत्येक फवारणीसाठी १० मिली प्रति पंप अनिवार्य आहे. गरज भासल्यास पिकाच्या स्थितीनुसार पहिली फवारणी पुन्हा करावी.
- तण व्यवस्थापन : पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी खुरपणी करावी. दुसरी खुरपणी पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी करावी. पेरणीनंतर १५ ते २१ दिवसांनीच तणनाशकाची फवारणी करावी.
- खताची दुसरी मात्रा : दोन ते तीन फुले दिसल्यास खाली दिलेल्या खताची फवारणी करून नंतर पिकाला पाणी द्यावे. युरिया - २०-३० किलो. दुसरी फवारणी खताची दुसरी मात्रा दिल्यानंतर दोन दिवसांनी करावी. (ही खताची मात्रा प्रति एकरसाठी दिली आहे.)
- दुसरी फवारणी : दुसरी फवारणी खताची दुसरी मात्रा दिल्यानंतर दोन दिवसांनी करावी. खाली दिलेल्या घटकांचे प्रमाण प्रति १५ लिटर पंपासाठी आहे. वरद चमत्कार - ५ मिली, फ्लॉवर मजबूत - २५ मिली, डब्ल्यू-जजमेंट - २० मिली, वी-इमान - २० मिली, पॉवर सेव्हर (स्टिकर) चे मिश्रण - प्रत्येक फवारणीसाठी १० मिली प्रति पंप वापरावे. गरज भासल्यास पिकाच्या स्थितीनुसार दुसरी फवारणी पुन्हा करावी.
- तिसरी फवारणी : तिसरी फवारणी शेंगा तयार करताना करावी. खाली दिलेल्या घटकांचे प्रमाण प्रति १५ लिटर पंप आहे. एमिनो जेल - २५ ग्रॅम, व्हाई-कॉम्बो - २५ ग्रॅम, व्ही-टोन - २५ मिली, व्हे-प्राइड - १५ ग्रॅम, पॉवर सेव्हर (स्टिकर) मिसळणे. प्रत्येक फवारणीसाठी १० मिली प्रति पंप वापरावे. गरज भासल्यास पिकाच्या स्थितीनुसार तिसरी फवारणी पुन्हा करावी.



### काढणी

८० ते ९० टक्के पाने काड्यांसह गळून पडतात आणि शेंगांचा रंग पिवळा ते काळा होतो तेव्हा सोयाबीन पिकाची काढणी करावी. बियाण्यातील ओलावा १४ ते १५ % असेल तेव्हा काढणी करावी. पीक धारदार विळ्याने जमिनीलगत कापून उन्हात चांगले वाळवावे. शेतकऱ्यांनी तज्ज्ञांचा सल्ला घेऊन प्रत्यक्ष शेतात तांत्रिक माहितीचा अवलंब करावा.

# ओमानजवळ तेलवाहू जहाजाला आग; २४ भारतीय खलाशी अडकले

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** मध्यपूर्वेत इस्रायल आणि इराण यांच्यात पुन्हा एकदा युद्धाचा भडका उडाला असतानाच, या संघर्षमय वातावरणात एक अत्यंत चिंताजनक घटना समोर आली आहे. ओमानच्या समुद्रकिनाऱ्याजवळ आणि धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या होर्मुझ सामुद्रधुनीच्या परिसरात 'मारीवेक्स' या तेलवाहू जहाजाला (ऑइल टँकर) अचानक आग लागली आहे. या जहाजावर तब्बल २४ भारतीय खलाशी कार्यरत असल्याने देशाची चिंता वाढली आहे. सोमवारी दुपारी दीड वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला. सुदैवाने, या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नसून सर्व भारतीय खलाशी सुखरूप असल्याची दिलासादायक प्राथमिक माहिती समोर आली आहे.



या घटनेची माहिती मिळताच 'फॉरवर्ड सीमेन्स युनियन ऑफ इंडिया' या संघटनेने तातडीने पावले उचलली आहेत. युनियनने 'एक्स' या समाजमाध्यमावर एक पोस्ट शेअर करत परिस्थितीचे गांभीर्य निदर्शनास आणून दिले. ओमानच्या किनाऱ्याजवळ अडकून पडलेल्या या २४ भारतीय खलाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी संघटनेने थेट भारत सरकार आणि भारतीय नौदलाकडे तातडीच्या मदतीची याचना केली आहे. सध्या जहाजावरील नेमके नुकसान किती झाले आहे आणि अडकलेल्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची सविस्तर नावे काय आहेत, याची अधिकृत माहिती अद्याप गुलदस्त्यात आहे.

या संपूर्ण प्रकरणावर केंद्रीय जहाजबांधणी मंत्रालयाने बारकाईने लक्ष केंद्रित केले आहे. मंत्रालयाचे संचालक ओपेश कुमार शर्मा यांनी स्पष्ट केले की, 'मारीवेक्स' या जहाजाला लागलेली आग ही तांत्रिक बिघाडामुळे लागली की हा युद्धाच्या पार्श्वभूमीवर झालेला एखादा हल्ला होता, याचे मूळ कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेचा सखोल तपास सुरू आहे. एक मोठी जमेची बाजू म्हणजे, ज्यावेळी ही घटना घडली तेव्हा टँकरमध्ये कोणतेही इंधन किंवा माल नव्हता; अन्यथा मोठा स्फोट होऊन भयंकर अनर्थ ओढवला असता. हे जहाज भारतातील कारवार बंदरावरून ओमानच्या दिशेने मार्गक्रमण करत होते. जहाजबांधणी मंत्रालय आता परराष्ट्र मंत्रालय आणि संबंधित जहाजाच्या मालकांशी सतत संपर्कात असून परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# १६०० अंश तप्त लोहरस अंगावर पडल्याने ८ मजुरांचा मृत्यू

**विशाखापट्टणम (वृत्तसंस्था) –** आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथील स्टील प्लान्टमध्ये सोमवारी मोठा अपघात झाला. प्लान्टमध्ये सुमारे १६००ओउ तापमानाचे वितळलेले लोह (मोल्टन आयर्न) मजुरांवर पडले. या अपघातात ८ मजुरांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. सर्व जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्लान्टमध्ये क्रेनच्या मदतीने एका मोठ्या बकेटमध्ये वितळलेले लोह एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेले जात होते. याच दरम्यान बकेटचा तोल बिघडला आणि त्यातील गरम लोह खाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर पडले.

हा अपघात राष्ट्रीय इस्पात निगम लिमिटेड च्या स्टील प्लान्टमध्ये झाला. अपघातानंतर प्लान्ट परिसरात गोंधळ उडाला. मदत आणि बचाव पथकाने तात्काळ घटनास्थळी पोहोचून जखमींना बाहेर काढले आणि रुग्णालयात पोहोचवले.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, सध्या अपघाताच्या कारणांची चौकशी सुरू आहे. तांत्रिक बिघाड किंवा सुरक्षा मानकांमध्ये कोणतीही त्रुटी होती का, याचा शोध घेतला जात आहे.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले. तर, गृहमंत्री वंगालापुडी अनिता यांनी विशाखापट्टणमचे जिल्हाधिकारी आणि शहर पोलीस आयुक्तांशी फोनवर बोलून घटनेची माहिती घेतली. त्यांनी अधिकाऱ्यांना जखमींना उत्तम उपचार देण्याचे आणि बचावकार्य वेगाने करण्याचे निर्देश दिले.

विशाखापट्टणम स्टील प्लान्ट केंद्र सरकारच्या पोलाद मंत्रालयाच्या अखत्यारीतील सार्वजनिक



क्षेत्रातील उपक्रम आहे. या प्लान्टमध्ये उत्पादन १९९२ मध्ये सुरू झाले होते. हा देशातील पहिला आणि एकमेव किनारी स्टील प्लान्ट आहे, जिथून कच्च्या मालाची आयात आणि तयार पोलादाची निर्यात केली जाते.

हा प्लान्ट सुमारे ३३,००० एकरमध्ये पसरलेला आहे. याची सध्याची उत्पादन क्षमता वार्षिक सुमारे ७.३ दशलक्ष टन आहे. विशाखापट्टणम प्लान्टमध्ये लांब पोलादी उत्पादने तयार होतात, ज्यांचा वापर बांधकाम, रेल्वे, पायाभूत सुविधा, ऑटोमोबाइल आणि अभियांत्रिकी क्षेत्रात होतो. यात टीएमटी बार, वायर रॉड, स्ट्रक्चरल स्टील आणि इतर पोलादी उत्पादनांचा समावेश आहे.

२०२१ मध्ये केंद्र सरकारने याच्या खाजगीकरणाचा प्रस्ताव ठेवला होता, ज्याला आंध्र प्रदेशात मोठ्या प्रमाणावर विरोध झाला. ठखछड दीर्घकाळापासून आर्थिक संकट आणि कच्च्या मालाच्या किमतीसारख्या समस्यांशी झुंजत आहे. २०२५-२६ मध्ये केंद्र सरकारच्या आर्थिक मदतीमुळे आणि उत्पादन वाढल्यामुळे प्लान्टच्या स्थितीत सुधारणा दिसून आली.

## 'भारतातील आर्थिक राजकीय संकटे-वास्तव आणि परिणाम' विषयावर टिळक भवनमध्ये १३ जूनला विशेष चर्चासत्र

**मुंबई (प्रतिनिधी) –** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अर्थशास्त्र विभाग व ऑल इंडिया प्रोफेशनल काँग्रेसच्या वतीने दिनांक १३ जून २०२६ रोजी काँग्रेस पक्षाचे मुख्यालय टिळक भवन येथे एका विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. 'भारतातील आर्थिक राजकीय संकटे-वास्तव आणि परिणाम' विषयावर हे चर्चासत्र असून माजी केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हा, अर्थतज्ज्ञ अरुणकुमार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी खासदार कुमार केतकर, प्रदेश काँग्रेसच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख विश्वास उटगी हे या चर्चासत्रात सहभागी होत आहेत तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आहेत.

देश सध्या गंभीर आर्थिक संकटातून जात असून महागाई प्रचंड वाढलेली आहे, बेरोजगारांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे, कामगार क्षेत्रावर संकट आले आहे. नवीन नोकऱ्या उपलब्ध होत नाहीत, उलट कंत्राटी पद्धतीने नोकरभरती केली जात आहे. नोटबंदी व जीएसटीमुळे कृषी क्षेत्र व उत्पादन क्षेत्र पूर्णपणे कोलमडून पडले आहे. बँकिंग आणि विमा क्षेत्रही धोक्यात असून देशात फक्त २-३ बँकाच शिल्लक ठेवण्याचा घाट घातला जात आहे. वित्तीय क्षेत्राचे परदेशीकरण हा सर्वात मोठा धोका आहे. सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांचा फटका सर्वच क्षेत्रांना बसत आहे. या अत्यंत गंभीर मुद्द्यांवर या चर्चासत्रात अर्थतज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीकडून देण्यात आली आहे.

## सेन्सेक्स ७१९ अंकांनी कोसळला; गुंतवणूकदारांचे नुकसान

**मुंबई (प्रतिनिधी) –** भारतीय शेअर बाजारात सप्ताहाच्या सुरुवातीलाच गुंतवणूकदारांना मोठा झटका बसला आहे. जागतिक बाजारातील कमकुवत संकेत आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे भारतीय बाजारात आज घसरण झाल्याचं पाहायला मिळालं. आजच्या सत्रादरम्यान मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 'बीएसई सेन्सेक्स' तब्बल ७१९ हून अधिक अंकांनी कोसळला. तर दुसरीकडे, राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक 'निफ्टी ५०' देखील २४३ अंकांनी घसरून २३,१२३ वर पोहोचला. बाजारातील या अचानक आलेल्या भूकंपामुळे गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये एकाच झटक्यात बुडाले आहेत.

कच्च्या तेलाच्या किमतीत भडका : आंतरराष्ट्रीय बाजारात ब्रेंट क्रूड ऑईलच्या किमतींमध्ये झालेली मोठी वाढ हे बाजार घसरण्याचे सर्वात मुख्य कारण आहे. भारत हा खनिज तेलाचा मोठा आयातदार देश असल्याने तेलाच्या किमती वाढल्यास देशांतर्गत महागाई वाढण्याची भीती निर्माण होते.

भू-राजकीय तणाव : आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेषतः पश्चिम आशियातील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परिणामी, जागतिक गुंतवणूकदारांनी जोखमीच्या मालमत्तांमधून (इक्विटी) पैसे काढून घेण्यास सुरुवात केली आहे.


### Change In Name


My Old Name is **AFSHAN** ( As Per Birth Certificate ) Wich Now I am Changing As New Name **AFSHA FIRDOUS MOHAMMED ALI** Hence Forth My All Correspondance Will Be Done As Per My New Name Please Consider the Same.

**Sign By : AFSHA FIRDOUS MOHAMMED ALI**
Address : 9-7-1173, Near Sharifa Masjid, Hyder Bagh No.1
Degloor Naka, Itwara, Nanded.( Maharashtra ).431604
Mobile No : 8605273811

### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



### टी.सी. हरवली

माझी तौकीर उल अकमल या नावाची बारावीची टी.सी. नांदेड ते विष्णुपूरी ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**पत्ता. तौकीर उल अकमल**
**रा. बिलाल नगर, नांदेड**
**मो.नं. ७३८५२२२८८१**

### पाहिजेत

मिलिंद शिक्षण प्रसारक मंडळ अंबाडी ता.किनवट जि.नांदेड द्वारा संचलित वसतिगृहात खालील प्रमाणे पदे भरावयाचे आहे.

| अ.क्र. | वसतिगृहाचे नांव | पद | दरमहा मानधन | संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृह गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड | चौकीदार<br>स्वंयपाकी | ७५००<br>८५०० | ०१<br>०१ |
| २ | आदर्श मुलींचे वसतिगृह,गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड | चौकीदार | ७५०० | ०१ |
| ३ | रमामाता आंबेडकर मुलींचे वसतीगृह गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड | चौकीदार | ७५०० | ०१ |

वरील पदे मानधन तत्वावर भरावयाची असल्यामुळे इच्छूक उमेदवारांनी दिनांक २१/०६/२०२६ पर्यंत सकाळी ११:०० वाजता संस्थेच्या गोकुंदा ता. किनवट जि.नांदेड येथील कार्यालयात मुळ कागदपत्रासह स्वखर्चाने उपस्थित रहावे.

**सेक्रेटरी** **अध्यक्ष**
**मिलिंद शिक्षण प्रसारक मंडळ आंबाडी ता.किनवट जि.नांदेड.**

---

मिलिंद शिक्षण प्रसारक मंडळ अंबाडी ता.किनवट जि.नांदेड संचलित

### वसतिगृह प्रवेश सूचना

**प्रियदर्शिनी मुलींचे वसतिगृह,गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड**

इयत्ता ११वी पासून पुढील अभ्यासक्रमाकरिता खालील प्रमाणे वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे. सन २०२६-२७ या शैक्षणीक वर्षाकरिता शासनाच्या निर्धारित जातीच्या प्रतिशतमध्ये प्रवेश देणे सुरु आहे.

| एस.सी. | एस.टी. | व्हीजेएनटी | ओबीसी | एसबीसी | खुले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | ०७ | ११ | १९ | ०२ | ४८ | १०० |

**इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.**

| अ.क्र. | वसतिगृहाचे नांव | एस.सी. | एस.टी. | व्हीजेएनटी | ओबीसी | एसबीसी | खुले | अंध/अपंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे वसतिगृह,गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड | २० | ०४ | ०५ | ०३ | ०१ | ०१ | --- |
| ०२ | रमामाता आंबेडकर मुलींचे वसतिगृह, गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड | १७ | ०३ | ०४ | ०४ | ०१ | ०१ | --- |
| ०३ | आदर्श मुलींचे वसतिगृह,गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड | १५ | ०३ | ०४ | ०३ | ०१ | --- | --- |

वरील प्रमाणे सन २०२६-२७ या शैक्षणीक वर्षाकरिता शासनाच्या निर्धारित जातीच्या प्रतिशतमध्ये रिक्त जागांसाठी प्रवेश देणे सुरु आहे. जातीच्या विहित प्रमाणामध्ये प्रवेशाकरिता आवेदनपत्र प्राप्त न झाल्यास उपलब्ध आवेदन पत्रामधून इतर जातींच्या विद्यार्थ्यांना / विद्यार्थीनींना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल. तरी गरजू विद्यार्थी / विद्यार्थीनींनी संबंधीत वसतिगृह अधिक्षकांकडून आवेदन पत्र प्राप्त करावे व आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह विहित मुदतीत सादर करावे.

वसतिगृह अंतीम निवड यादी दि.१३/०६/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. दि.१५/०६/२०२६ रोजी वसतिगृह नियमितरित्या सुरु करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**अधिक्षक / अधिक्षिका संबंधित वसतिगृह** **सेक्रेटरी** **अध्यक्ष**
**मिलिंद शिक्षण प्रसारक मंडळ आंबाडी ता.किनवट जि.नांदेड.**

### Change In Name

My old Name is **SHAIKH SHAHBAZ TANVIR** Which now I am Changing as New Name **SHAIKH SHAHBAZ TANVIR SHAIKH SALEEMUDDIN** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address: H.NO.801, NOMANIYA NAGAR, TAROD BU NANDED-431605
Mob: 8888461935

### कागदपत्र हरवले

माझी बालाजी उत्तम जोगदळे या नावाची दहावी पासचा मार्कमेमो व सनद, बारावी पासचा मार्कमेमो व सनद, आधारकार्ड, पॅनकार्ड, वाहन चालक परवाना तसेच इतर महत्त्वाचे कागदपत्रे सिडको ते चंदासिंग कॉर्नर ऑटो प्रवासात हरवले आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**– संपर्क पत्ता –**
**बालाजी उत्तम जोगदळे**
**रा. डोलारा ता. लोहा जि. नांदेड मो.नं. ९५२९३०१३०३**

### Change In Name

My old Name is **SHAIKH SHAHZAD ADIL** Which now I am Changing as New Name SHAIKH **SHAHZAD SHAIKH SALEEMUDDIN** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address: H.NO.801, NOMANIYA NAGAR, NEAR SANA HIGH SCHOOL, TAROD BK, NANDED - 431605 Mob: 7798494992

### Change In Name

My old Name is **SHAIKH SANA NAHEED** WhichnowIamChangingasNewName**SHAIKH SANA NAHEED SHAIKH SALEEMUDDIN** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address: H.NO.801, NOMANIYA NAGAR, NEAR SANA HIGH SCHOOL, TAROD BK, NANDED - 431605
Mob: 9421850987

### Change In Name

My old Name is **ATIKHUNNISA SHAIKH SALIMUDDIN** Which now I am Changing as New Name **ATIQUNISSA SADIQ ALI** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address: H.NO.801, NOMANIYA NAGAR, NEAR SANA HIGH SCHOOL, TAROD BU NANDED-431605
Mob: 9421850987

### Change In Name

My old Name is **PATHAN NASEEM BEGUM IBRAHIM KHAN** Which now I am Changing as New Name **NASEEM KHANAM MOHAMMED ZAHIRUDDIN** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address: Sr.No. 39 (B), Plot No. 20, Tahura Bag, Near Gausia Masjid Nanded 431601
Mo.No. 9860718687

### Change In Name

My old Name is **SHEIKH SALIMUDDIN.** Which now I am Changing as New Name **SHAIKH SALEEMUDDIN CHAND SAB** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address: H.NO.801, NOMANIYA NAGAR, NEAR SANA HIGH SCHOOL, TAROD BU NANDED-431605
Mob: 9421850987

### Change In Name

My old Name is **SHILPA SHRIKANT MUSANDE.** Which now I am Changing as New Name **SHILPA VITTHALRAO KALYANKAR** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address: D/o. Vitthalrao Kalyankar
At.Po. Gadgebaba Nagar, Loha, Loha
Nanded Mo.No. 9730857001, 7397831675

### जाहीर प्रगटन

मौजे वाडी (बु.) ता.जि. नांदेड हद्दीतील गट नं. १२/डी/१, १२/डी/३ मधील प्लॉट क्र. २ चा पश्चिमेकडील भाग साईज लांबी- दक्षिण-उत्तर : पूर्वेकडून ५० फुट म्हणजेच १५.२४ मीटर व पश्चिमेकडून ४९ फुट म्हणजे १५.११ मीटर व रूंदी - पूर्वे-पश्चिम : १५ फुट म्हणजे ४.५७ मीटर ज्याचे एकूण क्षेत्रफळ ७४६ चौ. फुटाचा प्लॉट रमेश (रामेश्वर) नागोजी खंदारे रा. श्रावस्तीनगर नांदेड यांचेकडून कांबळे नागोराव भीमराव रा. हसनाळ (पी.डी.) ता. मुखेड जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा- पूर्वेस - सदरील प्लॉटचा उर्वरीत भाग, पश्चिमेस - प्लॉट नं. ३, दक्षिणेस - सदरील सर्व्हे नं. पैकी जमीन व उत्तरेस - २० फुट रूंद रस्ता.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत कांबळे नागोराव भीमराव यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**कांबळे नागोराव भीमराव**
**रा. हसनाळ (पी.डी.) ता. मुखेड जि. नांदेड**

### नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड
### क्षेत्रिक कार्यालय क्र. ०६ सिडको

जा.क्र. : नांवाशमनपा/क्षेकाक्र./नापवि/३६०/२०२६

**जाहीर प्रगटन**
**संचिका क्र. ५६ सिडको/२०२६-२७**
**प्रकरण :- नाव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, ज्योत्सना मनोहर जांबळे रा. हडको नांदेड यांचा अर्ज दि. ४/५/२०२६ यांनी अर्ज सादर केला आहे की, मनपा / सिडको घर क्र. एन.डी.३२ एम/२३/०२ एकुण क्षेत्रफळ ३५.०० चौ.फुट आहे. ज्याचा महापालिका मालमत्ता क्र. ११-९-१०२ पीन नं. ४०५११०१३२४ जी.एम.पाटील दैवशाला अशोक मारूडवार यांचे नावे असलेली मालमत्ता अर्जदाराने खरेदीखत/विक्रीखत/सोसायटी कन्व्हेन्सडीड/ओनरशिप पद्धतीने विक्रीखत/भाडेपट्टा हस्तांतरण सिडको/हडको दस्त क्र. १११७३/२५ दि. २९/१२/२०२५ व सिडको प्रशासन भाडेपट्टा हस्तांतरण आदेश लिंकदस्त क्र. ५७४/२१ दि. २०/०१/२०२१ व लिंक दस्त क्र. १०३७४/११ दि. २४०/१०२०११ आधारे प्राप्त झालेली आहे. त्यांच्या नावाने नोंद नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालमत्ता कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासह दाखल करावा. अन्यथा वरील अवधी संपल्यानंतर सदरील मालमत्तेवर अर्जदाराच्या नावाने मालमत्ता कर आकारणी नोंद वहीत सदरील नावाची नोंद घेण्यात येईल.

चतुःसिमा - पूर्वेस - एन.डी.-३२/एम/२३/०१, पश्चिमेस - एन.डी.-३२/एम/२३/०३, दक्षिणेस - मोकळी जागा, उत्तरेस - ड्रेनेज लाईन.

**क्षेत्रिय अधिकारी**
**क्षेत्रिक कार्यालय क्र.६ सिडको**
**नांदेड वाघाळा शहर महापालिका नांदेड**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




### जिल्हा परिषदेचा आरोग्यदूत उपक्रम

## विद्यार्थीच गावांचा कायापालट करतील -राहुल कर्डिले



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषदेने विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेला आरोग्यदूत उपक्रम स्तुत्य असून शालेय विद्यार्थी आरोग्यदूत म्हणून गावागावांमध्ये आरोग्य जनजागृती घडवून आणतील आणि गावांचा कायापालट करतील, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या वतीने नांदेड येथील शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजित आरोग्यदूत प्रशिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सागर, पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा उपायुक्त एस. बी. खुणे, कृषी विकास अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले, डॉ. राजाभाऊ गुट्टे, जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. संतोष नवले, डॉ. शिवशक्ती पवार, डॉ. सलमा हिराणी, दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार, मुख्यमंत्री फेलो भार्गवी मुंढे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शुभम तेलेवार आदी उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले, ग्रामीण भागात आजही अनेक नागरिक किरकोळ आजारांवर योग्य वैद्यकीय उपचार घेण्याऐवजी अंगावर दुखणे काढण्याचा प्रयत्न करतात. अशा परिस्थितीत नागरिकांना आरोग्याविषयी प्राथमिक माहिती देणारी आरोग्यदूत संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. आरोग्यदूत ही लोकचळवळ जिल्ह्यात आरोग्यसंपन्न समाज घडविण्यासाठी प्रभावी माध्यम ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना आरोग्य शिक्षणाबरोबरच कृषी, पशुसंवर्धन, स्वच्छता, पोषण आहार याविषयी माहिती द्यावी. या उपक्रमातून प्रशिक्षित विद्यार्थी आपल्या कुटुंबात आणि गावात आरोग्यविषयक मार्गदर्शकाची भूमिका पार पाडतील, असेही त्यांनी सांगितले.

**आरोग्यदूत उपक्रमातून जनजागृतीसह वैज्ञानिक दृष्टिकोनाला चालना– मेघना कावली**

ग्रामीण भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्यविषयक माहिती सहज उपलब्ध व्हावी, आरोग्याबाबतचे गैरसमज दूर व्हावेत आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, या उद्देशाने जिल्ह्यात आरोग्यदूत उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिली. त्या म्हणाल्या, या उपक्रमाद्वारे गावपातळीवर आरोग्यविषयक जनजागृती, मार्गदर्शन आणि लोकसहभाग वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. आरोग्यदूतांच्या माध्यमातून विविध आजारांबाबत प्राथमिक माहिती, प्रतिबंधात्मक उपाययोजना, स्वच्छतेचे महत्त्व, पोषण, पशू व मानव आरोग्याशी संबंधित बाबी तसेच अपघात व आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ, डॉक्टर आणि विविध विभागांच्या समन्वयातून हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येणार असून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून आरोग्यविषयक जागरूकतेची व्यापक चळवळ उभी राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे यांनी केले, तर आभार रेणुका दराडे यांनी मानले.

## डीआयजी ऑफिस ते भगतसिंग चौक रस्त्यावर मनपाची 'बुलडोझर' कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या पायाभूत सुविधांचा विकास आणि वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महानगरपालिकेने सोमवार, दि. ८ जून रोजी एक मोठी कारवाई केली. कौठा परिसरातील डीआयजी ऑफिस (विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय) ते भगतसिंग चौक या दरम्यान रस्ता रुंदीकरणाच्या कामात अनेक वर्षांपासून अडथळा ठरत असलेली अवैध अतिक्रमणे महापालिकेच्या अतिक्रमण हटाव पथकाने भुईसपाट केली आहेत. या धडक कारवाईमुळे आता या भागात ३० मीटर रुंदीचा रस्ता तयार करण्याचा मार्ग निर्विघ्न झाला आहे.

कौठा ते असर्जन दरम्यान या भागातील वाढती वाहतूक लक्षात घेता हा रस्ता ३० मीटर रुंद केला जाणार होता. सदरील रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत असून, या रस्त्याची एकूण लांबी १.६३ कि.मी. अशी आहे. सदरील रस्त्याच्या कामास भगतसिंग चौकापासून सुरुवात करण्यात आली होती, परंतु पद्मजा सिटीच्या परिसरात सदरील कामास स्थानिक प्लॉटधारकांनी विरोध दर्शविला होता. यामध्ये प्रामुख्याने स्थानिक भूधारक शहाणे यांच्या विरोधास न जुमानता महापालिकेने सिमांकनानुसार अतिक्रमण काढण्याची भूमिका घेत रस्त्याच्या कामातील अडथळा दूर केला आहे. कारवाईदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

हा रस्ता कौठा परिसराला शहराच्या मुख्य भागांशी जोडणारा एक महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र, रस्त्यावरील वाढत्या अतिक्रमणा-मुळे येथे सातत्याने वाहतूक कोंडी होत होती आणि अपघातांचा धोका वाढला होता. महापालिकेच्या या कारवाईमुळे स्थानिक नागरिक, वाहनचालक आणि व्यापारी वर्गाने सुटकेचा श्वास सोडला आहे. सदरील कारवाई पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त अजितपालसिंघ संधु यांच्या नेतृत्वात कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, नगररचनाकार ओम लहाने, उपअभियंता खुशाल कदम, अतिक्रमण विभागाचे सहायक आयुक्त रावण सोनसळे, क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, राजेश जाधव, अतिक्रमण पथक प्रमुख दत्ता कल्याणकर, विशाल सोनकांबळे यांच्यासह अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभाग व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली.

**महापालिकेचा इशारा**

शहराच्या विकास आराखड्यानुसार रस्त्यांचे रुंदीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांनी स्वतःहून रस्त्यावरील अतिक्रमणे काढून प्रशासनाला सहकार्य करावे, अन्यथा यापुढेही अशीच तीव्र मोहीम राबवून दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा महानगरपालिका प्रशासनाने दिलेला आहे.

## एलसीबीच्या छाप्यात साडेचार लाखांचा गुटखा जप्त; गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरामध्ये राज्य सरकारने बंदी घातलेला विविध कंपनीचा गुटखा, सुगंधी सुपारी, पान मसाला आदी आरोग्याला घातक असलेले अन्नपदार्थ सर्रास विक्री होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर वरिष्ठांच्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शहराच्या जुनागंज भागात कारवाई केली. यावेळी साडेचार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ऑपरेशन क्रॅकडाऊन अंतर्गत अवैध धंद्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मोहीम पोलिसांनी हाती घेतली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले हे स्वतः फिल्डवर उतरून आपल्या अन्य सहकार्यांनाही सोबत घेऊन अवैध धंद्याविरुद्ध कडक कारवाई करण्याच्या सूचना देत पुढाकार घेत आहेत. त्यानुसार सपोनि विठ्ठल घोगरे व त्यांचे पथकातील अंमलदार हे दि. ७ जून रोजी इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलींग करीत असताना जुना गंज, गणीपुरा येथे फेमस हॉटेलच्या पुर्वेस असलेल्या गल्लीमध्ये एक जण राज्य सरकारने प्रतिबंधीत केलेला गुटखा लपवून ठेवून त्याची विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून सदरची माहिती वरिष्ठांना कळवून त्यांच्या आदेशाप्रमाणे मिळालेल्या माहितीचे ठिकाणी जुना गंज, गणीपुरा नांदेड येथे फेमस हॉटेलच्या पूर्वेस असलेल्या गल्लीमध्ये सापळा लावून मोहम्मद अल्ताफ शेख छोटे मिया (वय २३ वर्ष, रा. शालीमार शादीखाना जवळ, हरूण बाग, देगलुर नाका, नांदेड) यास ताब्यात घेवून त्याच्या जवळ असलेल्या पिवळ्या फारीखाली पाहणी केली असता महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला अन्न पदार्थ गुटखा, सुगंधीत पान मसाला, सुगंधीत जर्दा, तंबाखू किंमत ४ लाख ५० हजार ३७ रुपयाचा मुद्देमाल सापडला. सदरचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरचा माल हा शेख जुबेर शेख खदीर रा.गुज ता. भैसा जिल्हा निर्मल, राज्य तेलंगणा याने पाठविला असल्याचे सांगितले. आरोपी मोहम्मद अल्ताफ शेख छोटे मिया यास मुद्देमालासह पो.स्टे. इतवारा यांचे ताब्यात देऊन मोहम्मद अल्ताफ शेख छोटे मियाँ, रा. शालीमार शादीखाना जवळ, हरूण बाग, देगलूर नाका, नांदेड व शेख जुबेर शेख खदीर रा.गुज ता. भैसा जिल्हा निर्मल, राज्य तेलंगणा असे दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुदखेड-माळकौठा रस्त्यावर कारचा अपघात

### दोन जण जखमी



**मुदखेड (प्रतिनिधी)** –मुदखेड-माळकौठा रोडवरील श्रीकृष्ण पेट्रोल पंपाजवळ सोमवारी पहाटेच्या सुमारास एका कारचा भीषण अपघात झाला. चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने कार रस्त्याच्या कडेला असलेल्या मुरमाच्या ढिगाऱ्याला आणि संकेतांक खांबाला धडकून पलटी झाली. या अपघातात कारमधील दोघेजण जखमी झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

पहाटे सव्वा सहा वाजेच्या सुमारास मुदखेड-माळकौठा रोडवरील श्रीकृष्ण पेट्रोल पंपाच्या समोर आणि 'पंचकृष्ण हॉटेल'च्या बाजूला कार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. भरधाव कार थेट रस्त्याशेजारील मुरमाच्या ढिगाऱ्यावर चढली आणि बाजूच्या खांबाला धडकून उलटली. अपघात इतका भीषण होता की, गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.

ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून जखमींवर तातडीने उपचार सुरू केले. योग्य वेळी मदत आणि उपचार मिळाल्याबद्दल जखमींच्या नातेवाईकांनी आणि नागरिकांनी मुंगल कुटुंबीय तसेच मुदखेड येथील डॉक्टरांचे आभार मानले आहेत.

## उत्तमराव सूर्यवंशी यांचे निधन



**भोकर (प्रतिनीधी)** –भोकर येथील उत्तम बाजीराव पाटील सूर्यवंशी मातुळकर (पणन महासंघाचे सेवानिवृत्त ग्रेडर) वय (७०) यांचे ८ जून रोजी २०२६ रोजी दुपारी १२ वाजताच्या दरम्यान पवार कॉलनी भोकर येथील राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. ९ जून रोजी स. १० वा. हिंदु स्मशानभूमी भोकर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## खत टंचाईवरून हिमायतनगरात कृषी कार्यालयासमोर शेतकऱ्यांचे अर्धनग्न आंदोलन

**○ स्थानिक शेतकऱ्यांना खत नाकारून बाहेरील लोकांना पुरवठ्याचा आरोप ○ कृषी विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह ○**

**नांदेड (प्रतिनिधी)** – हिमायत-नगर येथे खरीप हंगाम तोंडावर असताना तालुक्यात खत टंचाईचा प्रश्न गंभीर बनला आहे. खत वितरणातील कथित अनियमिततेविरोधात शेतकऱ्यांचा संताप उफाळून आला आहे. तालुक्यातील कृषी दुकानदार आणि कृषी विभागाच्या संगनम तातून स्थानिक शेतकऱ्यांना खतापासून वंचित ठेवून काळाबाजार करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट)चे तालुकाध्यक्ष वामनराव पाटील वडगावकर यांनी केला आहे.

या निषेधार्थ सोमवार, दि. ८ जून रोजी हिमायतनगर येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर वामनराव पाटील वडगावकर यांनी तब्बल तासभर अर्धनग्न आंदोलन करत कृषी विभाग व खत विक्रेत्यांच्या कथित मनमानी कारभाराचा जाब विचारला. या आंदोलनाचे व्हीडीओ आणि छायाचित्रे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून,



अनेक शेतकरी या आंदोलनाला पाठिंबा देताना दिसत आहेत.

तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाकडून उपलब्ध झालेला हक्काचा खत साठा काही दुकानदारांकडून नातेवाईक व जवळच्या व्यक्तींच्या मोबाईलवर OTP घेऊन खत संपल्याचे कारण सांगत स्थानिक शेतकऱ्यांना खत नाकारले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिणामी, खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांना जादा दराने खत खरेदी करण्याची वेळ येत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. याशिवाय तालुक्यातील खत साठा स्थानिक शेतकऱ्यांना प्राधान्याने देण्याऐवजी विदर्भातील काही भागातील नातेवाईक व मर्जीतील लोकांना पुरवठा होत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

आंदोलनावेळी काही शेतकरी खत टंचाई व वितरणातील अनियमिततेबाबत निवेदन देण्यासाठी कृषी कार्यालयात गेले असता, काही खत विक्रेत्यांकडून अरेरावीची भाषा वापरण्यात आल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली.

## मनपाकडून मान्सूनपूर्व नाले सफाई कामांना वेग

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेमार्फत शहरातील मान्सूनपूर्व तयारी अंतर्गत नाले, गटारे व पाणी निचरा मार्गांच्या सफाईची कामे युद्धपातळीवर सुरू असून, आतापर्यंत सुमारे ८५ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. सर्व प्रभागांमध्ये गाळ काढणे, कचरा हटविणे व पाणी निचऱ्यातील अडथळे दूर करण्याची कामे नियमितपणे करण्यात येत आहेत.

महापौर कविता मुळे आणि आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या सूचनेवरून स्वच्छता विभागामार्फत शहरातील प्रमुख नाले, गटारे व पावसाळी पाणी



निचरा मार्गांची साफसफाई करण्यात येत असून पावसाळ्यात पाणी साचणे, दुर्गंधी निर्माण होणे तसेच आरोग्यविषयक समस्या उद्भवू नयेत यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या विविध यंत्रणांद्वारे जेसीबी, पोकलेन मशीन तसेच मनुष्यबळाच्या सहाय्याने गाळ काढण्याची कामे वेगाने सुरू आहेत. काढण्यात आलेला गाळ तत्काळ उचलून त्याची विल्हेवाट लावण्यात येत आहे. उर्वरित कामेही निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

तसेच शहरातील नागरिकांनी नाल्यांमध्ये व सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, ओला व सुका कचरा वेगळा करून घंटागाडीला द्यावा व शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन मनपा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

## नांदेड विभागात हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर नेटवर्कचा विस्तार

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने रेल्वे सुरक्षिततेच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत मिरखेल आणि उमराम येथे दोन नवीन हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर कार्यान्वित केले आहेत. हे दोन्ही डिटेक्टर २७ मे २०२६ पासून कार्यरत झाले आहेत.

या नव्या स्थापनेमुळे नांदेड विभागातील हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर केंद्रांची संख्या तीनवरून पाच झाली असून, यापूर्वी नांदेड विभागात मुगट, बसमत आणि दौलताबाद या तीन ठिकाणी हे होते. हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टरमुळे धावत्या गाड्यांमधील कार्ट्रिज टेपर रोलर बेअरिंग व ॲक्सल बॉक्सच्या स्थितीवर अधिक प्रभावीपणे आणि रिअल-टाइममध्ये नजर ठेवणे शक्य झाले आहे.

हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर ही एक अत्याधुनिक सुरक्षा प्रणाली असून, गाडी सामान्य वेगाने जात असताना तिच्या ॲक्सल बेअरिंगचे तापमान स्वयंचलितपणे मोजते. तापमानात असामान्य वाढ आढळल्यास संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांना तत्काळ सूचना दिली जाते. त्यामुळे किरकोळ दोष मोठ्या बिघाडात रूपांतरित होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येतात. या तंत्रज्ञानामुळे रोलिंग स्टॉक आणि रेल्वे पायाभूत सुविधांचे नुकसान टाळण्यास मदत होते.

## धर्माबादमध्ये महावितरणविरोधात नागरिकांचा आक्रोश मोर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरात वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, विजेचा लपंडाव, तसेच विद्युत वितरण कंपनीच्या निष्काळजी कारभाराच्या निषेधार्थ सोमवार, दि.८ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पानसरे चौक येथून मुख्य रस्त्याने मोर्चा निघाला. धर्माबाद शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत आक्रोश मोर्चा काढला. मोर्चामध्ये विविध सामाजिक संघटना, व्यापारी, शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिक सहभागी झाले होते.

मोर्चादरम्यान नागरिकांनी विद्युत वितरण कंपनीच्या विरोधात घोषणाबाजी करीत शहरातील वीज समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. थोडासा पाऊस किंवा वारा आला की, संपूर्ण रात्रभर वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने नागरिक, विद्यार्थी, व्यापारी व रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची भावना मोर्चेकऱ्यांनी व्यक्त केली.

यावेळी नागरिकांच्या वतीने संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. धर्माबाद, रत्नाळी व बाळापूर परिसरासाठी स्वतंत्र वीज उपकेंद्र (सबस्टेशन) मंजूर करावे, शहरातील वीजपुरवठा तत्काळ सुरळीत करावा, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी तसेच नागरिकांना होणारा त्रास थांबवावा, अशा प्रमुख मागण्या निवेदनात करण्यात आल्या. मोर्चाला संबोधित करताना वक्त्यांनी सांगितले की, वीज ही नागरिकांची मूलभूत गरज असून वारंवार वीज खंडित होत



असल्यामुळे जनजीवन विस्कळीत होत आहे. प्रशासनाने तत्काळ उपाययोजना न केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मोर्चेकऱ्यांनी दिला.

मोर्चाच्या शेवटी विद्युत वितरण कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. नागरिकांचा वाढता रोष पाहता प्रशासनाने या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख मारोती पाटील कागेरू, गणेश गिरी, बालाजी बनसोडे, गणपत कात्रे, राजू शिरामणे, भुमेश कनकंमवाड, माजी नगरसेवक संजय पवार, शिवराज पाटील चोळाखेकर, दत्तात्रय पाटील कावडे, सचिन रेड्डी, अविनाश पिंगळे, गंगाधर धडेकर, सुदर्शन वाघमारे, सिद्धेश्वर मठपती, मीनाताई भद्रे, बाबुराव गोणारकर, माजीत शेख, विरभद्र वारले, दीपक झाडे, कुलदीप मस्के, स्वामी, राजू चिंतावार यांच्यासह शहरातील हजारो नागरिक उपस्थित होते.

मोर्चाला गालबोट लागू नये यासाठी धर्माबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सदाशिव भडिकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गणेश कराड, माधव लोणेकर, मुत्यपोड, गुप्त शाखेचे प्रमुख बालाजी कौठकर, होळगे, सलिम पठाण यांच्यासह महिला पोलीस कर्मचारी व पोलीस कर्मचारी, होमगार्ड यांचा बंदोबस्त तैनात केला होता.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.



फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com